# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २४.०८.२००५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०७) इतिवृत्त**

बुधवार दिनांक २४ ऑगष्ट २००५ रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.काशिनाथ कोकाटे** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''मलिक अंबर स्थायी समिती सभागृह '' येथे दुपारी १.०० वाजता ''वंदे मातरम्'' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

(०१) श्री. कावडे साहेबराव राणुबा
(०२) श्री. खान मुजीब मिर आलम खान
(०३) सौ. खंदारे वंदना प्रकाश
(०४) श्री. गवळी रविकान्त काशीनाथ
(०५) श्री. जगीरदार अजेजमुख्तार अहमद
(०६) सौ.जधव संगिता विठ्ठलराव
(०७) सौ.दलाल लता श्रीनिवास
(०८) श्री. दाभाडे मिलींद यशवंत
(०९) श्री. दिलीप नारायण गायकवाड
(१०) श्री. नासेर नहदी मोहंमद याहीया नहदी
(११) श्री. पांडे विनायक प्रभाकर
(१२) श्री. बारवाल गजनन रामकिशन
(१३) श्री. बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
(१४) श्री. विसपुते शशांक दामोधर
(१५) श्री. वैद्य रेणूकादास दत्तोपंत

**संवाद :**

श्री.मुजीब खान : पाच महिन्यापुर्वी मनपा सार्वत्रिक निवडणूक झाली. अधिकारी बजेट बुक मिळाले नसल्याने कामे करता येत नाहीत असे सांगतात. आता चार महिने बाकी असून ७० कोटीचे बजेट चार महिन्यात कशा पध्दतीने खर्च होणार आहे याचा खुलासा घ्यावा. आजपर्यंत कोणतेही अंदाजपत्रक तयार नाही. वॉर्डात साफसफाई नाही, पाणी प्रश्न सुटत नाही. नव्याने निवडून आलेल्या नगरसेवकांनी एकही काम केले नाही म्हणून शहरवासियांत बदनामी होत आहे.

श्री.अजिजजहागिरदार : सहा महिने निघून गेले आता वॉर्ड कार्यालयाचा निर्णय झाला. त्यासाठी नियमावली तयार केली का? असेल तर त्याची प्रत स.सदस्यांना दिली नाही. खुलासा व्हावा.

सौ. लता दलाल : वार्ड कार्यालये केली परंतु साफसफाई अजूनही पुर्वीच्या स्थितीत नाही. तांत्रिक विभाग बदल्यांमुळे पूर्णपणे विस्कळीत झालेला आहे. शहरातील अनेक रस्त्यांवर खड्डे पडलेले आहेत. ड्रेनेजची देखील हीच परिस्थिती आहे. वॉर्ड कार्यालय निर्माण करावयाची होती तर प्लॅनिंग केले नव्हते का? वार्डात कामे होत नाहीत म्हणून जनता नाराजआहे. त्यांना उत्तर देऊ शकत नाही. त्याची दखल कोणी घेत नाही. अधिकारी सांगतात आम्हाला अधिकारच दिले नाही. आम्ही सूचना मांडायच्या कुणाकडे? वार्डात कामे का होत नाही म्हणून नागरीक नगरसेवकांना जब

विचारतात, अधिकारी जबाबदारी घेत नसतील व कोणतीच कामे करीत नसतील तर प्रशासनाने बदल्या केल्या कशासाठी? पाणी पुरवठ्याचा सब ओव्हरसिअर अमुक आहे, हा नाही तो आहे म्हणून दोघेही येत नाहीत. नगरसेवकांना वार्ड कार्यालयात जवून पाणी सोडा, सफाईकरीता मजूर द्यावे म्हणून मागणी करावी लागते. एकमेकांवर चालढकल करतात. असे होत राहिले व कामे होत नसतील तर जनता येथे बसू देणार नाही याची नोंद प्रशासनाने घ्यावी.

श्री.रविकांत गवळी : सर्वांचा एकच प्रश्न आहे कामे होत नाहीत. अधिकारी कर्मचाऱ्यांकडे तक्रार केली तर सांगतात माझी बदली झाली, काही सांगतात मी रूजू झालो नाही. आम्ही कुणाकडे तक्रार मांडायची. हर्सूल तलावाचे सांडपाणी व एक नाला माझ्या वार्डाच्या मागच्या बाजूने वाहतो आहे. त्या नाल्यात माती साचलेली असून नाला अरूंद झालेला आहे. नाल्याच्या कडेला अतिक्रमण झाल्यामुळे पावसाने लोकांचे नुकसान झाले. हे लोक टॅक्स भरतात असे अधिकारी सांगतात. टॅक्स भरतात म्हणून ते घर अधिकृत झाले का? याबाबत चौकशी व्हावी.

श्री.विनायक पांडे : वॉर्ड ऑफिस केले परंतु अजूनही कामाला सुरूवात झालेली नाही. माझ्या वार्डात नळाला ड्रेनेज मिश्रीत पाणी येत होते. वॉर्ड इंजिनिअरकडे तक्रार केली. त्यांना त्याबद्दल काहीच माहित नव्हते. शेवटी पाणी पुरवठा विभागाचे कर्मचारी बोलावून काम केले. ज्यांना पाणी पुरवठ्याच्या लाईन माहिती आहेत त्यांनाच मेन्टेनन्सची कामे द्यावीत. खामनदीवर अनेक लोकांनी अतिक्रमण केले त्यांना नोटीस देऊन उठविण्यात यावे.

श्री.गजनन बारवाल : बदल्या केल्या चांगला निर्णय घेतलेला आहे. माझ्या वार्डाचे संबंधीत वॉर्ड इंजिनिअर यांनी अत्यंत चागले काम करण्याचा प्रयत्न केला आहे. महाराष्ट्रात सर्वच ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाऊस झाला, लोकांवर मोठे संकट आलेले आहे. मुंबईत मोठमोठ्या इमारती कोसळल्या. आपल्या शहरात ज्या धोकादाय इमारती आहेत त्यांना नोटीस दिल्या का? शहरातील शालेय इमारतींची पाहणी करून मोडकळीस आलेल्या असतील त्या पाडण्यात याव्यात.

श्री. मुजीब खान : आताच स.सदस्य श्री.बारवाल यांनी त्यांचे वार्डात कामे होत असल्याचे सांगितले. त्याप्रमाणेच इतरही ९७ वार्डात कामे व्हावीत अशी आमची मागणी आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : माझ्या वार्डातील वॉर्ड इंजिनिअर देखील अतिशय मेहनत करतात. प्रत्येक भागात जतात. हाताखालचे कर्मचारी त्यांना देणे आवश्यक आहे. सफाई कर्मचाऱ्यांची संख्या कमी आहे. याकडे लक्ष देण्याची गरज आहे. अधिकार वापरणारे विभाग प्रमुख असतात त्यांच्या बदल्या करणे आवश्यक आहे. खालच्या संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या करून काही साध्य होणार नाही. एचओडी जेपर्यंत बदलल्या जणार नाही तोपर्यंत विभागात बदल होणार नाही. झोन अधिकाऱ्यांची बदली झाली तर सफाई कामगारांना शिस्त लावण्याचा प्रयत्न होऊ शकेल. तीन चार बैठकीपासून ज्याच्याबद्दल बोललो त्यांच्या बदल्या झाल्या नाही. जे चांगले काम करतात त्यांच्या तातडीने बदल्या केल्या. जे चांगले काम करीत नाहीत, ज्यांच्याबद्दल तक्रारी आहेत अशांच्या साधारणत: बदल्या केल्या जतात. सोयीनुसार बदल्या झाल्या असे वाटते. मागील वर्षभरात रस्त्यांची १३ कोटीची कामे केली. एका पावसात रस्त्यांवर खड्डे झाले. शासनाने पावसामुळे झालेल्या

नुकसानीबद्दल अहवाल पाठविण्यास कळविले. त्यासाठी पुन्हा रस्त्याची पाहणी करावी, चौकशी करावी व त्याच्या नुकसानीचा अहवाल शासनास तातडीने पाठवावा. अनुदानात समावेश होईल.

सौ. लता दलाल : दुय्यम आवेक्षक, कनिष्ठ अभियंता यांचेशी कामे पडतात. वार्ड इंजिनिअर, कार्यकारी अभियंता यांना कामे सांगणार का? माझ्या वार्डातील पाणी पुरवठ्याची परिस्थिती बरोबर नाही. ड्रेनेजचोकअप झाल्यास आम्ही विचारायचे कुणला. अशी अनेक ठिकाणी परिस्थिती आहे. याचा विचार व्हावा. वॉर्ड रचना होऊन एक महिना झालेला आहे. एखाद्या वार्डात काम झाले असेल. आम्ही सुध्दा या सभागृहाचे स.सदस्य आहोत. या नात्याने आमच्याही वार्डात कामे व्हावीत. नागरीकांचा रोष आमच्यावर आहे. वार्डात कामे झाली पाहिजेत. प्रत्येक वेळेस आम्ही एचओडी कडे जऊ शकत नाही. त्यांनी लक्ष दिले पाहिजे अनेक ठिकाणी १५-२० मिनिटे पाणी येते. त्यात सुधारणा झाली पाहिजे एकही अंदाजपत्रक अद्याप तयार नाही. बजेट बुक मिळाले नाही असे उत्तर देण्यात येते. दिवाळी पर्यंत तरी काही तरी कामे झाली पाहिजेत.

श्री.अजिजजहागिरदार : मोठ्या प्रमाणात बदल्या केल्या. ज्यांना ५-५, १०-१० वर्ष झाले त्यांच्या बदल्या करणार असे ठरले होते. परंतु माझ्याकडे यादी आहे. जकात विभागात काही कर्मचारी १०-१५ वर्षापासून एकाच ठिकाणी काम करतात. त्यावर विचार करावा. जेजवळचे आहेत त्यांना ठेवायचे व जेजवळचे नाही त्यांना पाठवायचे.

श्री.कंवरसिंग बैनाडे : सभागृहात कामे करण्या संदर्भात मान्यता देतो. प्रशासन अंमलबजवणी करीत नाही. सिडको-हडको भागात ४-५ लक्ष लोकसंख्या आहे. १९८७ मध्ये नाट्यगृह मंजूर झाले. त्यावर काय कार्यवाही करण्यात आली. सिडकोकडून काही निधी उपलब्ध झालेला आहे का? नसेल तर पाठपुरावा केलेला आहे का? ८-१० वर्ष या कामास लागत असतील तर चर्चा करून काही अर्थ नाही. बोर्ड लावून उद्घाटन होते मग आतापर्यंत काम का चालू झाले नाही. सर्वांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. खुलासा करावा.

श्री.विनायक पांडे : बीबीका मकबरा समोरील रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडलेले आहेत. पर्यटक येतात, मनपाची बदनामी होते. किमान तो रस्ता तरी दुरूस्त करावा. या संदर्भात तक्रार केली, स्थायी समितीमध्ये सूचना केली परंतु काम होत नाही.

श्री.रविकांत गवळी : प्रभाग -अ मधील उप अभियंता यांना निलंबीत केले त्यांचे जगी कोणाची नेमणूक केली तसेच वार्ड कार्यालयात जेई., दुय्यम आवेक्षक किती याची माहिती द्यावी. कामाची सुरूवात करायची तर तक्रार कुणाकडे द्यावी याची माहिती आम्हाला नाही.

श्री.शशांक विसपुते : मागच्या पावसामुळे गारखेडा, बाळकृष्णनगर भागात आपण प्रत्यक्ष पाहणी केली एका कॉलनीमध्ये एक फुटापर्यंत पाणी तुंबलेले होते. महिलांना पाण्यातून जवे लागते. पाणी काढण्याबाबत सूचना दिल्या होत्या. त्यानुसार बाळकृष्णनगरचा प्रश्न सुटला परंतु तेच पाणी कल्पतरू, माणकनगरकडे जते. आता दोन वस्तीमध्ये साचलेले आहे. वारंवार पाठपुरावा केला पण काम झालेले नाही. अधिकारी गांभीर्य लक्षात घेत नाहीत हे योग्य नाही. याबाबत खुलासा घ्यावा.

श्री.दिलीप गायकवाड : सुजता हौ.सो.मध्ये अतिक्रमण झाले तेथे काम चालू आहे का? डी.पी.रोडवर लक्ष्मी ट्रेडर्सने इमारत बांधली आहे का?

श्री.नासेर नहदी : ज्यांच्या बदल्या केल्या त्यातील काही कर्मचारी हे वरीष्ठ अधिकाऱ्यांच्या शिफारशीनुसार त्यांचेकडे दिलेले आहेत. उर्वरीत जे होते त्यांना झोनला देण्यात आले. खाम नदीला पाणी आले होते, लोकांची घरे पाण्यात होती. मा.आयुक्तांनी भेट दिली त्यावेळी सांगण्यात आले की, घरे रिकामी करून नदीची जगा खाली करावी. तेथील रहिवाशी गरीब असून कमी किंमतीत प्लॉट घेऊन घरे बांधतात. जे लोक भरती टाकून जगा तयार करून प्लॉटस् विक्री करीत आहेत त्यांचेवर गुन्हा दाखल करावा.

सौ.संगिता जधव : वृत्तपत्रात बातमी आली की यापुढेही पुंडलिकनगरच्या रहिवाश्यांना टँकरचाच आधार आहे. पुंडलिकनगर, जयभवानीनगर, गजननगर, हनुमान नगर, भारत नगर, मातोश्री नगर, न्यायनगर भागात गेल्या १० वर्षापासून टँकरच्या पाण्यावर तहान भागवत आहे. यापुढेही टँकरचाच आधार राहील का? ६७ कोटीची पाणी पुरवठा योजना रद्द झाली तर टँकरचाच आधार घ्यावा लागेल का? १९९७-९८ मध्ये युती शासनाने ६७ कोटीच्या योजनेस मंजूरी दिली. येथील पाण्याचा प्रश्न बिकट होता. पुंडलिकनगर, न्यायनगर तसेच सिडकोचा पाणी प्रश्न सोडविणे हाच उद्देश समोर ठेवून समितीने वेळोवेळी केलेल्या पाठपुराव्यामुळेच ४० लक्ष लिटर क्षमतेचे जलकुंभ उभारणी व त्यात पाणी पुरवठ्यासाठी जलवाहिनी टाकण्याचे काम मंद गतीने सुरू आहे. ते काम आता होत नाही असा निर्णय महापालिकेने घेतला आहे. नवीन योजना २००९ मध्ये हाती घेतली जाईल. त्यावेळी जलकुंभात पाणी येणार असे म्हटले आणि ४ वर्षे टँकरद्वारेच पाणी देणार का? याचा खुलासा व्हावा.

सौ. वंदना खंदारे : वार्ड क्र.८६ प्रियदर्शनी इंदिरानगर या भागात पाणी आणि ड्रेनेजच्या मोठ्या समस्या आहेत. त्यामुळे महिला सदस्य असूनही आम्हाला नागरीकांच्या तक्रारी ऐकून घ्याव्या लागतात. या वाडृतील समस्या सोडवाव्यात तसेच पोच रस्त्याचे कामही करण्यात यावे.

श्री.मिलिंद दाभाडे : चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या मोठ्या प्रमाणात बदल्या केल्या. भावसिंगपुरा भागातील महिला कामगारांस चिकलठाणा वार्डमध्ये नियुक्ती दिली. त्यांना जण्याची काय व्यवस्था तसेच प्रशासकीय विभागातील एका कर्मचाऱ्याची बदली केलेली नसून प्रशासकीय अधिकारी यांची बदली करावी म्हणून अनेकवेळा मा.आयुक्तांकडे निवेदन दिले. परंतु बदली केली नाही. असा दुजभाव प्रशासन का करते. प्रशासकीय अधिकारी उत्तर देऊ शकले नाही. त्यांचेवर कार्यवाही करण्यात यावी.

मा. सभापती : सन २००५-०६ मधील कामाचे एकही अंदाजपत्रक मंजूरीसाठी अद्याप या सभागृहासमोर आले नाही. स.सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्या बरोबर असून सहा महिन्यांचा कालावधी लोटला आहे. ४ महिनेच कामासाठी शिल्लक असून अधिक्षक अभियंता हे पद महापालिकेत आहे. त्यांचेकडे सर्व कामे आहेत. त्यांना सहाय्य करण्यास तीन कार्यकारी अभियंता आहेत. अधिक्षक अभियंता हे पद जबाबदारीचे संपूर्ण तांत्रिक विभागाशी संबंधीत आहे. स.सदस्यांनी केलेल्या सूचनांच्या अनुषंगाने अधिक्षक अभियंता यांनी खुलासा करावा. बदल्यापासून ते कामे केव्हा होणार यासंबंधीचा खुलासा करावा. नियोजन काय, या आर्थिक वर्षात खर्च करण्यासंबंधी काही धोरण ठरले आहे का? कामास सुरूवात करावी म्हणून

मी स्वत: संबंधीत विभागांना पत्र दिलेले आहे. बजेट बुक नाही हा खुलासा मान्य नाही. पत्र देवून जी कामे नमूद केली त्यांचे अंदाजपत्रक १५ दिवसात तयार करण्याच्या सूचना दिल्या होत्या. परंतु कोणत्याही कामाचे अंदाजपत्रक समोर आलेले नाही. लेखी आदेश व सूचना दिल्या होत्या. १५ दिवसांत अंदाजपत्रक सादर झाले पाहिजे अंदाजपत्रक तयार केल्यानंतर स्थायी समितीच्या मान्यतेसाठी सादर करावे नंतरच निविदा काढता येतील. अधिक्षक अभियंता यांनी त्यांचे विभागाचे कामाचे धोरण काय ठरवले, खुलासा करावा.

अधिक्षक अभियंता : सहा वॉर्ड ऑफीस केले. तेथे प्रत्येक वॉर्ड कमिटीचे सभापती यांची निवडही झालेली आहे. लहान सहान ज्या समस्या असतील त्या तातडीने सोडवाव्या यासाठी वॉर्ड ऑफीस निर्माण केले. वॉर्ड इंजिनिअरची नेमणूक करतांना 'ब' वॉर्ड वगळता प्रत्येक वॉर्ड अभियंता यांना ३ जेई. व दुय्यम आवेक्षक असे कर्मचारी दिलेले आहेत. जे जेष्ठ आहेत व व्यवस्थित काम करू शकतील त्यांना वॉर्ड इंजिनिअर म्हणून नेमणूक दिली. वॉर्ड कमिटीला जेअधिकार आहेत त्यानुसार वॉर्ड इंजिनिअरनी काम करावे. त्यांचे अधिकाराबाबत आज्ञा आदेश पारीत केले. यापुर्वी २ बैठका त्यांचे समवेत घेतलेल्या असून काम कसे करायचे याची कल्पना दिलेली आहे. त्यात रस्त्याची दुरूस्ती, ९ मीटरचे जेरस्ते असतील त्याची दुरूस्ती वॉर्ड इंजिनिअर यांनी करावी. तसेच ड्रेनेज समस्या,देखभाल दुरूस्ती, उद्यान, स्मशानभुमी याबाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर त्वरीत करतील. अधिकाराच्या वरची जी कामे असतील त्याकरीता ताबडतोब अंदाजपत्रक तयार करून त्यांचेशी संबंधीत कार्यकारी अभियंता यांची मान्यता घेऊन निविदा काढून कार्यवाही होईल. अंदाजपत्रक तयार करण्याबाबत पत्र दिलेले होते. अंदाजपत्रक तयार करण्याचे काम चालू आहे. १५-२० दिवसाचा अवधी लागेल. पाणी पुरवठ्याचे संपूर्ण काम हे कार्यकारी अभियंता यांचे नियंत्रणाखाली चालेल.

श्री.मुजीब खान : लहान कामे वॉर्ड ऑफीस मार्फत होणार असा खुलासा केला. एक अंदाजपत्रक वॉर्डमध्ये मंजूर तर दुसरे कार्यकारी अभियंता यांचेकडे येईल. ४ महिने बाकी असून आणखी एक महिना अंदाजपत्रक तयार करण्यासाठी लागेल असा खुलासा केला. ३ महिने शिल्लक राहतात. लहान कामे करण्यास किती पर्यंतचे अधिकार देणार आहोत? बदल्या करताना भेदभाव केलेला असून ज्यांच्या बदल्या केल्या त्याची यादी द्यावी. कोणत्या ठिकाणी कोणाची नियुक्ती केली हे कळेल. ३ महिन्यात ७० कोटीची कामे होतील का? कामे झाली नाही तर प्रशासनास जब विचारला जईल. लवकरात लवकर अंदाजपत्रके तयार करावी.

सौ. लता दलाल : दुय्यम आवेक्षक किती याचा खुलासा केलेला नाही. वॉर्ड ऑफीस अंतर्गत १६ वॉर्ड येतात. एका वार्डाची व्याप्ती मोठी आहे, सफाईच्या बाबतीत ४ वॉर्ड मिळून एक स्वच्छता निरीक्षक आहे तसे एक जेई.किती वार्डसाठी दिले. दुय्यम आवेक्षक किती दिले याचा खुलासा करावा.

अधिक्षक अभियंता : एक वॉर्ड ऑफीससाठी ३ कनिष्ठ अभियंता तसेच ६ दुय्यम आवेक्षक द्यायचे होते. संख्या कमी असल्यामुळे 'ब' वॉर्ड सोडून इतर ठिकाणी ४ सब ओव्हरसिअर दिलेले आहेत. आणखी प्रत्येक वॉर्डसाठी २ दुय्यम आवेक्षक लागतील, तशी मागणी केली आहे. काही दुय्यम आवेक्षक निलंबीत असल्याने प्रत्येक वार्डात ६ देता आले नाही. एका कनिष्ठ अभियंता यांचेकडे ४-५ वार्ड येतात. त्यांनी तेथील

कामे करायची आहेत. किरकोळ कामे त्वरीत व्हावी म्हणून वॉर्ड इंजिनिअरला १० हजर रूपये मर्यादेपर्यंत अधिकार दिलेले आहेत. यापेक्षा मोठी कामे असतील तर वॉर्ड इंजिनिअर हे कार्यकारी अभियंता यांची मंजुरी घेवून तेथेच ते काम करतील.

सौ. लता दलाल : वार्ड ऑफीसची रचना ही तातडीने कामे होण्यासाठी झालेली आहे. २५ हजराचे काम असेल तर त्यास वेळ न लावता ते सुध्दा तात्काळ व्हावे. अशी आमची मागणी आहे.

श्री.अजिजजहागिरदार : नियमावली का बनवली नाही. नियमावली केल्यास त्यात सर्व बाबींचा खुलासा होईल. नियमावली वेगळी, आदेश वेगळे समजण्यायला मार्ग नाही. वार्ड अधिकारी यांना कर आकारणीचे अधिकार सुध्दा दिले का?

श्री.शशांक विसपुते : १० हजराचे अधिकार दिले परंतु अंदाजपत्रकावर कार्यकारी अभियंता यांची मंजुरी लागेल असे सांगण्यात येते. निविदा काढण्याचे अधिकार वार्ड अभियंता यांनाच देण्यात यावे, त्यांना सक्षम करावे.

श्री.रेणुकादास वैद्य : जे आदेश पारित केले त्याची प्रत नगरसेवकांना द्यावी. तसेच वार्ड इंजिनिअर यांना अधिकार देण्यात यावे. प्रोसेसमध्ये वेळ न लावता तात्काळ कामे व्हावीत ही अपेक्षा आहे.

श्री.रविकांत गवळी : वार्ड ऑफीसमध्ये जेई.दिले ते एकत्रित सर्वच वार्डात काम करणार की प्रत्येकाकडे वेगवेगळे वार्ड असणार. तसे प्रभाग 'अ' चे वार्ड इंजिनिअर यांना निलंबीत केले त्यांचे जगेवर कुणाची नियुक्ती केली खुलासा करावा.

मा. सभापती : खुलासा समाधानकारक वाटत नाही. वार्ड इंजिनिअर यांना काही अधिकार देण्याचे आदेश केले. १० हजराचे अहधिकारात नवनि कामे करणार की दुरूस्तीचीच कामे करणार हा खुलासा केलेला नाही. लेखी आदेशाची माहिती देणे आवश्यक आहे. आर्थिक अधिकार देत असताना पदाधिकाऱ्यांशी चर्चा करण्याची गरज भासली नाही का? तो अधिकार प्रशासनास असेल तर कोणत्या नियमान्वये आहे याचाही खुलासा करावा.

अधिक्षक अभियंता : यासंबंधी मा.आयुक्तांशी चर्चा केली होती. १० हजर रूपयांचे अधिकार देण्याचे निश्चित केले त्यानुसार आदेश काढले. मंजुरीसाठी स्थायी समितीसमोर तो विषय येणारच आहे. तसा आदेशात उल्लेख केलेला आहे.

मा. सभापती : कार्योत्तर मंजुरी कशासाठी? वार्ड ऑफीस करण्याचे आपणास माहित होते. काही अधिकार द्यावे लागणार हे माहित होते. स्थायी समिती समोर प्रस्ताव का सादर केला नाही? यापुर्वी दोन सभा झाल्या. प्रशासन महानगरपालिका चालवते, पदाधिकारी कशासाठी आहेत? प्रशासन महिन्याला ५०-६० हजराचा खर्च आमच्यावर करते तो कशासाठी असा प्रश्न येतो. तुम्हाला प्रशासन चालवायचे तर बंद करा. आयुक्त म्हणून जेकुणी काम पाहात आहेत त्यांनी खुलासा करावा.

उप आयुक्त (म) : १ ऑगस्ट २००५ पासून ६ प्रभाग कार्यालये अस्तित्वात आलेली असून त्या प्रभाग कार्यालयात प्रशासकीय कामकाज हे वार्ड अधिकारी व अभियांत्रिकीचे काम वार्ड इंजिनिअर पाहणार आहेत. वार्ड अभियंता यांचेकडे खर्चाच्या बाबी असून त्यांना ते अधिकार प्रदान करण्यासाठी मा.आयुक्तांनी सविस्तर बैठक घेतली होती. त्या बैठकीत वार्ड अधिकारी व वार्ड इंजिनिअर यांना लहान कामे करण्यासाठी अधिकार प्रदान करण्यासंबंधी चर्चा झाली होती. हा आर्थिक बाबीचा अधिकार असल्यामुळे प्रस्ताव स्थायी समितीसमोर यावयास पाहिजे परंतु वार्ड

कार्यालय होऊन बराच कालावधी होत आहे म्हणून आदेश काढून स्थायी समितीची मान्यता घेतली जईल असे मा.आयुक्तांनी म्हटले होते. त्यानुसार आदेश निर्गमित केले.

श्री.मुजेब खान : वॉर्ड कार्यालय केले, जे वाटले ते प्रशासन करीत आहे. अधिकार देण्याबाबत स्थायी समिती, सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक होते. परंतु तसे होत नाही. प्रथम अधिकार देणार नंतर प्रस्ताव मंजुरीसाठी येणार. प्रशासन येथे लोकप्रतिनिधी आहेत हे विसरून गेलेले आहेत. हीप्रथा बरोबर नाही. आमच्या अधिकारावर गदा येऊ नये.

श्री.रेणुकादास वैद्य : येथे प्रशासक काम करतो अशी भावना प्रशासनाची झालेली दिसते. लोकप्रतिनिधींना ते विसरलेले दिसत आहे.

सौ. लता दलाल : वॉर्ड ऑफिस सुरू होण्यापुर्वी त्याची रचना कशी असणार या संदर्भात विचारणा केली होती. सभागृहासमोर येईल असे सांगण्यात आले होते. नगरसेवकांचे अनेक प्रश्न आहेत. ऑर्डर देऊन प्रशासन मोकळे झाले. लोकप्रतिनिधी म्हणून प्रशासनाला कोणती गरजभासली नाही, याची गंभीर नोंद घेतली जवी ही विनंती.

मा. सभापती : उप आयुक्त (म) यांनी कमी शब्दात खुलासा केला तो बरोबर वाटत नाही. स्वच्छ प्रशासन चालवण्याच्या दृष्टीने काम करावे. ही स्वायत्त संस्था आहे. या संदर्भात पदाधिकाऱ्यांना माहिती देण्यात आली नाही. अशा पध्दतीने प्रशासन चालत असेल तर योग्य नाही. सभागृहाला का विश्वासात घेतले नाही खुलासा करावा.

उप आयुक्त (म) : सर्व स.सदस्यांच्या वॉर्ड रचना व अधिकारा संबंधी ज्या ज्या सूचना आहेत त्या सर्व सूचना प्रशासनाने विचारात घेतलेल्या आहेत. १०-१५ मिनिटांत मा.आयुक्त येत आहेत. त्यांनी खुलासा केला तर जस्त उचित होईल.

मा. सभापती : बदल्या संदर्भात प्रशासनाने कोणते निकष लावले त्याचा खुलासा शहर अभियंता यांनी करावा.

श्री. मुजेब खान : १ तासासाठी सभा तहकूब करावी. मा.आयुक्त येतील तेव्हा खुलासा घ्यावा. बदल्याचे संदर्भात शहर अभियंता यांना अधिकार नाही.

मा. सभापती : मा. आयुक्त १५-२० मिनिटांत आले नाही तर सभा तहकूब केली जईल.

शहर अभियंता : अधिकार नाही. कोणाची बदली कुठे करावी याबाबत चर्चा झालेली होती. ज्यांना एका विभागात २-३-४ वर्षे झालेले होते त्यांच्या बदल्या केल्या. काही विभागातील कर्मचारी ५-६ वर्षापासून असूनही बदल्या केल्या नाही कारण त्या विभागाचे काम एकदम विस्कळीत होऊ नये म्हणून बदल्या केल्या नाही. पाणी पुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या केलेल्या नाहीत.

श्री.विनायक पांडे : जकात विभागात अनेक वर्षापासून असूनही काही कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्या नाही.

श्री.रेणुकादास वैद्य : काहींच्या बदल्या केल्या जस्त दिवसापासून हाते म्हणून तर काहींना ठेवले कामात सुसूत्रता असावी म्हणून. नेमके अमुक लोकांना पाठवावे व अमुक यांना पाठवू नये असे का ठरले ?

मा. सभापती : मा. आयुक्त येईपर्यंत सभा १५ मिनिटांकरीता तहकूब करण्यात येते.

(दुपारी २.१५ वा. सभा तहकूब दुपारी ३.३० वाजता सभेला पुन्हा सुरूवात. यावेळी मा.आयुक्त सभेस उपस्थित असतात.)

मा. सभापती : वॉर्ड अभियंता यांना देण्यात आलेले अधिकार व तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या बदल्या संदर्भात अधिक्षक अभियंता यांनी केलेला खुलासा समाधानकारक नसल्याचे सभागृहाचे मत आहे. सभागृहास अपेक्षित खुलासा मा.आयुक्त करतील असे उप आयुक्त(म) यांनी म्हटले. वॉर्ड ऑफिस करतांना नियोजन करण्यात आले होते. लहान कामे वॉर्ड ऑफिसमध्येच व्हावी हे धोरण समोर ठेवले. हे करीत असतांना लोकप्रतिनिधींना विश्वासात घेतले असे वाटत नाही. वॉर्ड अभियंता यांना अधिकार प्रदान करण्याचे संदर्भात सीयी समितीसमोर प्रस्ताव यावयास पाहिजेहोता तो आला नाही. प्रशासन चालवतांना लोकप्रतिनिधींना विश्वासात घेणे अपेक्षित आहे. तसेच बजेट प्रमाणे अंदाजपत्रक त्वरीत तयार करण्याच्या लेखी सूचना अधिक्षक अभियंता व सर्व कार्यकारी अभियंता यांना दिलेल्या होत्या. १५ दिवसात अंदाजपत्रक तयार करून सादर करावे व निविदा निघेल अशी व्यवस्था व्हावी. १५ दिवसात काय कार्यवाही झाली याची काहीच माहिती दिली नाही. एक-दीड महिन्याचा कालावधी झाला. आतापर्यंत अंदाजपत्रक तयार नाहीत. प्रशासन कामे केंव्हा करणार. सिडको हा या शहराचा अविभाज्य भाग आहे तेथील नाट्यगृहाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे.

श्री.कंवरसिंग बैनाडे : १९९५-९६ मध्ये या सभागृहात मी होतो. सिडको व महानगरपालिका यांनी मिळून सिडकोत नाट्यगृह बांधावे असे होते. २५ लक्ष सिडकोला देण्यात आले होते ते परत दिले आहेत अशी माहि आहे. तसेच नाट्यगृहासाठी आरक्षीत असलेला भूखंड हस्तांतर करून घ्यावा असे पत्र आले अशी माहिती आहे. प्रशासन या संदर्भात काय कार्यवाही करीत आहे?

मा. सभापती : २५ लक्ष दिले होते, ते सिडकोने परत दिले. दोन्ही संस्थांमध्ये तडजेड होऊन नाट्यगृह बांधण्याची जबाबदारी मनपाने घेतली. त्यासाठी तीन-चार वर्षापासून अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येत आहे. सिडको भागातील व्यवसायाच्या माध्यमातून जकात कर वसूल होतो याचा अर्थ मनपाच्या उत्पन्नामध्ये सिडकोचा वाटा आहे. आराखडा तयार केला ४ ते ४.५० कोटीचे बजेट केले होते. यावर्षी ५० लक्षचे बजेट तरतुद केलेली आहे. शसनाकडून १ कोटी येणार आहेत. सिडकोकडून २५ लक्ष परत मिळाले. या कामासाठी तात्काळ निविदा काढण्याची कार्यवाही करावी. तोंही खुलासा करावा. ६७ कोटीच्या पाणी पुरवठा योजने संदर्भात खुलासा करावा. त्यामुळे ६५ एमएलडी जस्तीचे पाणी मिळणार होते. आम्हाला अनधिकृत हा शब्द नको आहे. कोणत्याही भागात जे मनपा हद्दीत येतो तेथील प्रत्येक नागरीकाला पाणी मिळालेच पाहिजे शहरातील सर्वच भागात मुबलक पाणी देण्यासाठी काय नियोजन आहे याचा खुलासा करावा. मोठ्या पावसामुळे बाळकृष्णनगर, कटकटगेट, उस्मानपुरा, बेगमपुरा भागात घरांमध्ये पाणी शिरले, वस्त्यांमध्ये पाणी साचले यासंबंधी स.सदस्यांनी सूचना केलेल्या आहेत. हर्सुल तलाव सुदैवाने अद्याप ओव्हरफ्लो झाला नाही. खामनदीला पाणी येऊन प्राणहानी व इतर दुर्घटना होण्याची शक्यता आहे. लोक बेघर होतील. या संदर्भात काय कार्यवाही करणार आहोत? सर्व्हे करण्याची गरज आहे. जे कुणी नदीकाठी अनधिकृत प्लॉट विक्री करीत असेल त्यांचेवर कारवाई करावी.

श्री.मुजेब खान : निवडणुका होऊन ६ महिने होत आहेत. बजेटची प्रत मिळाली नाही असे कारण सांगितले जत आहे. कर्मचाऱ्यांच्या बदल्या कोठे केल्या माहित नाही. माझ्या

वार्डात गेल्या सहा दिवसांपासून साफसफाई होत नाही. सर्व गल्ल्यात घाण झालेली आहे. स्वच्छता निरीक्षकांना यासंबंधी माहिती दिली असता ४ वाजता येतो म्हणून सांगण्यात येते. प्रशासनाऐवजी आपणच खुलासा देत आहात. अंदाजपत्रक तयार करण्यास आणखी दीड महिना लागेल. ७० कोटीचे बजेट ४ महिन्यात कसे खर्च होणार याचा खुलासा द्यावा. कामे झाली नाही तर नगरसेवक प्रशासनास जब विचारतील. याची नोंद घेण्यात यावी.

मा. आयुक्त : ५० कोटीवरून ७० कोटीचे बजेट विकास कामांसाठी आहे. सर्वसाधारण सभेने मान्यता दिली आहे. बजेट बुक लवकरच सर्वांना देण्यात येईल. कामे पूर्ण करण्याचा १००% प्रयत्न केला जाईल. पाणी पुरवठ्याचे कामासाठी लाणारे पाईपची खरेदी एकत्रित टेंडर काढून करण्यात येईल. त्याचे इस्टीमेट १५-२० दिवसात तयार होतील. यामुळे १०-१५% खर्चात बचत होईल. रस्त्यासाठीचे बजेट १००% खर्च होईल. पावसाळ्या नंतर हे काम होईल. सप्टेंबर अखेर अंदाजपत्रक तयार करून टेंडर काढले जाईल. बजेट तरतुदीनुसार वसुलीची जबाबदारी प्रशासनाची आहे. जमा करू व खचृ सुध्दा होईल. या वर्षीचे बजेट हे एकत्रित आहे. वार्डाचे स्वतंत्र बजेट राहील. देखभाल दुरूस्ती ही १००% वॉर्ड ऑफिस मार्फत होणार. ९ मीटर रस्ते किंवा त्याखालील कमी रूंदीचे रस्त्यांची कामे वॉर्ड ऑफीस मार्फत होणार आहे. यावर्षी वॉर्ड ऑफीसला स्वतंत्र बजेट नसल्यामुळे रस्ते, ड्रेनेजव इतर कामेही वेळ लागू नये म्हणून वॉर्ड ऑफीस मार्फत करून घेणार आहोत. वॉर्ड ऑफिसला खर्च करण्यासाठी ठराविक रक्कम पुढील वर्षात देणार आहोत. सर्वत्र समान कामे करण्याचा विचार होईल. जेव्हा वॉर्ड ऑफीस केले तेव्हा काही अधिकार माझे होते. माझ्या अधिकारात देऊ शकलो असतो. अधिकार देण्याबाबत आदेश दिलेले आहे. रस्ते व ड्रेनेज इ.देखभाल दुरूस्तीची कामे तात्काळ होणेसाठी १० हजर खर्चाचे अधिकार दिलेले आहे. अशी कामे ४८ तासाच्या आत करण्याच्या सूचना दिल्या आहेत. १० हजरचे अधिकार देण्यासाठी स्थायी समितीसमोर येणे गरजेचे होते. परंतु ३-४ गोष्टी यात आहेत. टेंडर कुणी काढावे, कोठे उघडणार. स्लम विभागातील १० हजराची कामे वॉर्ड इंजिनिअरला नको होते. बजेट जस्त खर्च होऊ नये म्हणून बजेटची विभागणी करून द्यायचे आहे. ३.९६ कोटीचे दुरूस्तीसाठी बजेट आहे, १ कोटीची कामे मागील वर्षाची होती. उर्वरीत ३ कोटीतून प्रत्येक विभागास ५० लक्ष द्यायचे का? हे सर्व चर्चेत होते. अगोदर २५ लक्षची कामे करण्या संदर्भात निर्णय घेतला. डिसेंबर मध्ये आणखी २५ लक्ष प्रत्येक वॉर्ड ऑफीसला देण्यात येतील. अधिकारा बाबतचा प्रस्ताव येऊ शकला नाही. परवाच मी स्वाक्षरी केली. ऐनवेळी घ्यायचा अधिकार आपला आहे. नसता पुढील बैठकीत प्रस्ताव सादर होईल.

सिडको नाट्यगृहाच्या बाबतीत जगा ताब्यात घेण्याचे शासनाचे आदेश आहेत. १ कोटी शासन देणार आहे, २५ लक्ष सिडकोकडून परत मिळाले नव्हते. ते व्याजसह परत करावे म्हणून सांगण्यात आले परंतु व्याजसह मिळणार नाही असे वाटते. शासन कुणालाही व्याजदेत नाही. मा.विभागीय आयुक्तांकडे बैठक झाली तेव्हा यासाठी ५ कोटी लागणार आहे अशी चर्चा झाली. १ कोटी शासन देणार आणखी १ कोटीची मागणी करायची असे २ कोटी होतात. २ कोटी मा.खासदार धुत साहेब त्यांचे फंडातून देणार आहेत. ५० लक्ष बजेटमध्ये तरतूद

आहे. २५ लक्ष सिडकोने दिले आणखी २५ लक्ष तरतूद करू असे मा.महापौरांनी म्हटले आहे. असे ५ कोटीचे नियोजन होते. मला टेंडर काढण्याचे आदेश दिले यात अडचण अशी आहे की, प्रथम जगा ताब्यात घ्यावी लागेल. शासनाकडून १ कोटी आले नाहीत. मा.धुत साहेबांकडून मिळणाऱ्या २ कोटीसाठी केंद्र शासनाची मंजूरी लागेल. परंतु न आल्यास मनपा ५ कोटी खर्च करू शकेला का? शासनाचे एक मोटी, मनपाचे १ कोटी असे २ कोटीच होतात. मा.धूत साहेबांचे असे म्हणणे होते की, दोन कोटी देतो, प्लॅन दाखवावा. या आठवड्यात प्लॅन दाखवला जईल. त्यांचे पत्र जिल्हाधिकारी यांचेकडे दिलेले आहे. शासनाचे १ कोटी आले नाही तर मनपास पैसे टाकावे लागतील. २ कोटीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचेमार्फत केंद्र शासनाकडे गेल्यास जगा ताब्यात घेऊ. पुढील महिन्यात जगेचा ताबा घेऊन टेंडर काढण्याचा विचार आहे. तिसरा प्रश्न पाणी पुरवठ्याचा. ६७ कोटीची स्कीम होती. ६७ कोटी खर्च करून ६५ एमएलडी पाणी वाढणार का हा तांत्रिक मुद्दा होता. याबाबत महाराष्ट्र जेवन प्राधिकरणाचा सल्ला घेतला असता २०-२५ एम.एल.डी.पाणी वाढेल असे म्हटले. पाईप लाईन बदलल्यानंतर सुध्दा २०-२५ एमएलडी पाणी वाढू शकते. त्यापैकी ७-८ एम.एल.डी. वाढले आहे. आणखी १५ एम.एल.डी. पाणी वाढविता येईल. त्याबाबत जे.बी.ने मान्य केलेले आहे. दर १ एम.एल.डी. पाण्यासाठीएक कोटी लागतात. २० एम.एल.डी.च्या वर पाणी वाढवू शकणार नाही. पाणी वाढविण्यासाठी पी.एम.सी. नेमण्याचे, यावेळी एम.जेपी.ला न देता इतरांना द्यावे. हर्सूल तलावाच्या बाबतीत टेक्नीकली रिपोर्ट आहे की, त्याची उंची वाढविता येत नाही. जस्तीत जस्त १० एम.एल.डी.पाणी मिळेल. तलावातील गाळ कुणी घेवून जणार असेल त्यांना परवानगी देता येईल. मोठमोठे प्रोजेक्ट शासनाने केलेले आहे त्यात इतका गाळ साठला की, गाळ काढण्यासाठी लागणाऱ्या खर्चात नवीन धरण होते. जितक्या पाण्याची आवक आहे तेवढे पाणी तेथून घेत आहोत. नाल्याचा सर्व्हे झाला आहे. कठोर पावले उचलावे लागतील. नाल्याच्या कडेला ज्यांनी घरे घेतली असतील जरी ती काढावी लागली, विस्थापितांचे पुनर्वसनासाठी नारेगांव, हर्सूल येथे २४-२५ एकर जगा आहे. ले-आऊट करून ठेवले. परंतु ते लोक तेथे जणार की नाही हे माहित नाही. नाल्यावरील बांधकाम हे काढावे लागेल.

श्री. मुजेब खान : सीटी सर्व्हे ऑफीसला रेकॉर्ड असेल. नाल्याची हद्द किती आहे, अतिक्रमण आहे का? ३०, ४०, ५० फुट रूंदीचा फिक्स नाला असेल. काही ठिकाणी कमी-जस्त रूंदी आहे. अतिक्रमण काढले तर दुसरे लोक पुन्हा येऊन बसतात. चंपा मस्जेद ते रविंद्रनगर झोपडपट्टी शताब्दीनगर भागात २७२ घरे दिली. जे अतिक्रमण काढले होते पुन्हा त्या जगेवर अतिक्रमण झालेले आहे. नाल्याच्या बाजूचे अतिक्रमण काढले तर पुन्हा ते होऊ नये याची दखल घेतली जवी. सिटी सर्व्हे शिटवर नाल्याची रूंदी दाखविलेली आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

मा. आयुक्त : जेथे पाणी साचलेले होते अशा ठिकाणचे अंदाजपत्रक तातडीने मंजूर केलेले आहे. बाळकृष्णनगर चे ५ लाखाचे काम आहे. मी प्रत्यक्ष पाहणी करणार आहे. ७-८ दिवसात कार्यवाही होईल.

श्री.शशांक विसपुते : सध्या जे अडचण आहे त्यासाठी पाईप टाकल्यास पाणी वस्तीत जणार नाही. नाल्यापर्यंत जईल.

मा. आयुक्त : वॉर्ड ऑफिस लेव्हलच्या बदल्या केल्या. पाणी पुरवठा विभागाचा चार्ज डी.पी.कुलकर्णी यांचेकडे होता आता कायम दिलेला आहे. श्री.पानझडे हे सुटीवर होते. या व्यतिरिक्त विभाग प्रमुखांची बदली मी आतापर्यंत केलेली नाही.

श्री.रेणुकादास वैद्य : विभागप्रमुखांच्या बदल्या करणे आवश्यक होते. खालच्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या करून फारसे साध्य होणार नाही असे वाटते.

मा. आयुक्त : वॉर्ड ऑफिस करायचे होते म्हणून बदल्या केल्या. वॉर्ड ऑफीसचे कामकाज एकदा सुरळीत झाल्यावर विभाग प्रमुख व राहिलेल्या कर्मचाऱ्यांच्या दुसऱ्या टप्प्यात बदल्या करण्यात येतील.

श्री.मिलिंद दाभाडे : वर्ग-४ च्या कर्मचारी जे भावसिंगपुरा भागात राहतात त्यांना चिकलठाणा दिले त्यांचे जण्याचे साधन काय याचा विचार केलेला नाही. अर्ध्या तासात जऊ शकतील अशा ठिकाणी बदल्या कराव्यात.

श्री.कंवरसिंग बैनाडे : या मताशी मी सहमत नाही. प्रत्येकाला घराजवळ बदली देता येणार नाही. जेकेले ते योग्य केले.

मा. आयुक्त : काही लोकांना पुर्वीच्या जगेवर नको असेही कर्मचारी आहेत. एखाद्या वॉर्ड ऑफिसमध्ये बदली झाली त्याचे कार्यक्षेत्रात त्यांचे घर जवळ पडेल अशा वार्डात या कर्मचाऱ्यांना काम द्यावे अशी चर्चा झाली. तर पुनहा बदल्या होणार अशी चर्चा बाहेर जईल व कर्मचारी काम करणार नाहीत, असे होऊ नये. वैयक्तीक एखाद्या प्रकरणात फारच अडचण असेल तर विचार करता येईल.

श्री.मिलिंद दाभाडे : आस्थापना-१ चे अधिकारी श्री.जधव हे दिशाभूल करतात. बदल्या होणार आहे असे सांगतात.

श्री.रेणुकादासवैद्य : मजुरांचे शिपाई करण्यात आले होते ते कर्मचारी रूजू झालेले आहेत की नाही याचाही खुलासा करावा.

सहा.आयुक्त-१ : सर्व कर्मचारी रूजूझालेले असून लेबर म्हणून काम करीत आहेत.

मा. आयुक्त : सर्व रूजूझालेले आहेत.

श्री.रेणुकादास वैद्य : मजूर पदावरील किती कर्मचारी लिपीक, जवान, शिपाई म्हणून काम करतात?

सहा.आयुक्त-१ : वॉर्ड ऑफिसमध्ये नियुक्त केलेल्यांना कोणते काम दिले ही माहिती माझ्याकडे नाही.

सौ. लता दलाल : मजूर म्हणून नेमणूक असतांना शिपाई, क्लार्क म्हणून काम करतात का?

सहा. आयुक्त-१ : मजूर म्हणून आदेश दिले ते मजूर म्हणूनच काम करतात.

मा. सभापती : मजूर म्हणून आदेश असतांना १५० कर्मचारी शिपाई म्हणून काम करतात. अधिकाऱ्याला जर माहिती नसेल तर त्या पदावर काम करण्यास सक्षम नाहीत असे माझे मत आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : आतापर्यंत मनपात अनुशेष भरती झाली. खुल्या संवर्गातील एकही पद भरण्यात येत नाही. याचा विचार होण्याची गरजआहे.

श्री.विनायक पांडे : खुल्या संवर्गातील जगा वेळेवर न भरल्यामुळे लॅप्स झालेल्या आहेत याचाही खुलासा द्यावा.

सहा.आयुक्त-१ : एकही पद लॅप्स झालेले नाही.

सौ.लता दलाल : खुल्या संवर्गातील रिक्त पदे इतर संवर्गातून भरले गेले आहेत का?

सहा. आयुक्त-१ : अशा कोणत्याही जगा भरलेल्या नाहीत.

सौ. लता दलाल : संबंधीत अधिकारी दिशाभूल करीत आहेत. माहित नसेल तर माहिती नाही असे उत्तर द्यावे.

मा. सभापती : वाहन चालकांची ६ पदे रिक्त आहेत. एकही पद भरलेले नाही. अधिकारी स्वत:च्या पध्दतीने काम करीत असतील तर कार्यवाही प्रस्तावित करू. जेसी.बी.चालक १० वर्षापासून कार्यरत असताना व आर.आर.मध्ये तरतूद करून अनेक पदे भरली गेली आहेत. सभागृहाची दिशाभूल करीत असतील तर उप आयुक्त (प्र) यांनी दखल घ्यावी. पुढील बैठकीत याचा अहवाल सादर करावा.

श्री.रेणुकादास वैद्य : २२/११/२००४ रोजेच्या स्थायी समिती सभेमध्ये एका कर्मचाऱ्यावर निलंबनाची कार्यवाही करण्यात आली. कोणत्याही विभागात काम न करता त्या कर्मचाऱ्याने पूर्ण वर्षभर पगार घेतला. अशा पध्दतीने आस्थापना विभागाचे काम चालू आहे.

सहा.आयुक्त-१ : असा कोणताही कर्मचारी नाही. काम न करता पगार दिलेला आहे मला आठवत नाही.

मा. सभापती : उप आयुक्त (प्र) यांचेकडे मी नांव देतो, सहाय्यक आयुक्त-१ सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. चौकशी करावी.

उप आयुक्त (प्र) : दि.२२/११/२००४ च्या स्थायी समितीत हा विषय चर्चेला आला होता. त्या कर्मचाऱ्याचे नाव मोतीलाल खरे आहे. त्यावेळी चौकशी अधिकारी म्हणून कमलाकर फड यांना नियुक्त केलेले होते. अहवाल प्राप्त झालेला असून कार्यवाही प्रस्तावित केली आहे. पुढील बैठकीत माहिती दिली जईल.

मा. आयुक्त : कुणी कर्मचारी काम न करता पगार घेत असेल तर त्यांचेवर कार्यवाही होईल. उप आयुक्त (प्र) यांनी याची एक आठवड्यात चौकशी करावी व माहिती द्यावी.

श्री.मुजेब खान : कोणत्या ठिकाणी कोणते कर्मचारी दिले याची नगरसेवकांना माहिती असणे आवश्यक आहे. या बैठकीत झोन अधिकारी उपस्थित असणे आवश्यक आहे. कर्मचाऱ्यांच्या पुन्हा बदल्या होणार ही चर्चा होत आहे. त्यामुळे कोठेही वार्डात कर्मचारी बरोबर काम करीत नाही. प्रत्येक वार्डात मा.आयुक्त तसेच मा.सभापती यांनी भेट दिली तर किती कर्मचारी काम करतात ते दिसून येईल. ७ दिवसांपासून तक्रार करीत आहे. राऊंड घेतो, नवीन अधिकारी नसतात.

मा. आयुक्त : कुणाचीही बदली रद्द होणार नाही. कोणी मला तोंडी, लेखी याबद्दल सांगितले नाही. सर्व नगरसेवकांचे आभार व्यक्त करतो. त्यांनी सहकार्य केले.

मा. सभापती : वार्ड कार्यालयात मजूर वगळता वॉर्ड अभियंता, वार्ड अधिकारी, कनिष्ठ अभियंता, दुय्यम आवेक्षक इ. कर्मचारी, अधिकारी आहेत त्यांची यादी सर्व १०३ नगरसेवकांना देण्यात यावी.

श्री.दिलीप गायकवाड : सालारजंग, बागशेरजंग या भागात क्रिडांगणासाठी मनपाची आरक्षित जगा होती तेथे मोठमोठे अतिक्रमण झालेले आहे. त्या इमारतीस परवागनी दिली होती का?

स.सं. नगर रचना : बागशेरजंग भागात परवानगी देत नाही. ज्यांच्याकडे खरेदी खत आहे तशी परवागनी देण्यात येते. आरक्षणावर परवानगी देण्यात आलेली नाही. जे बांधकाम आहे ते अनधिकृत आहे.

श्री.मिलिंद दाभाडे : प्रशासकीय अधिकारी काय करीत होते.

मा. सभापती : सालारजंग, बागशेरजंग जे संपूर्ण सर्व्हे नंबर आहे त्यात कोर्टाच्या निकालाप्रमाणे परवानगी दिली आहे. त्याची चौकशी करून पुढील स्थायी समिती सभेत अहवाल देण्यात यावा. खुल्या संवर्गातील भरती बाबत आठ दिवसात कार्यवाही करावी व माहिती द्यावी.

श्री.मुजीब खान : मालमत्ता कर वसुली बाबत सांगू इच्छितो की, २४ हजर कर बाकी होता. कौशल्याबाई नांवाचे महिलेकडे मागील बाकी छ्खङ दाखवली आहे. झोन नं.३, झोन नं.४ यात बदल झाले. ६२४८/- नविन बील ऑफ डिमांड आले. मागील पावती देतो. तसेच एक व्यक्तीने ५५ हजर कर भरणा केला. रेकॉर्डवर ५ हजराची नोंद केली. कर वसुलीमध्ये असे प्रकार होत आहेत.

मा. सभापती : संबंधीत वॉर्ड अधिकारी तसेच उप आयुक्त (म) यांनी यात तफावत आढळल्यास कार्यवाही करावी.

श्री.नासेर नहदी : सिटी सव्हह्र नं.१२८७७ मोंढा नाका निर्मल असोसिएटस बाबत बोलत आहे. ही जगा वक्फ बोर्डची आहे. तेथे मनपाने अनधिकृतपणे बांधकाम परवानगी दिली आहे. सिंधी कॉलनी गुरूद्वारासमोर मोठ्या इमारतीचे बांधकाम चालू आहे. वक्फ बोर्डची एनओसी नसताना परवानगी दिली. नोटीस देऊन १५ दिवस झाले. परंतु काम आजही चालू आहे. अशी परवानगी देण्यात आली यास जबाबदार कोण. प्रत्येक व्यक्ती परवानगी मागेल त्यांना अशा प्रकारे परवानगी देणार का? निर्मल असोसिएटचा २५% भाग रजिष्टर कागदपत्र साठी हा भाग दिला गेला. प्लींन्थ लेव्हल पर्यंत बांधकाम परवानगीत अट आहे. प्लीन्थ लेव्हलची परवानगी कधी घेतली. संबंधीत बिल्डरचे पी.आर.कार्डवर नाव लावण्यात आले नव्हते. चार मजल्याचे काम झालेले आहे. मनपाने बांधकाम का थांबविले नाही? प्लिन्थ लेव्हलपर्यंत बांधकाम प्रमाणपत्र कोणत्या आर्कीटेक्टकडून घेतले गेले. यानंतर काय कार्यवाही झालेली आहे. कोर्ट केस क्र.१७२/९३ नुसार या मालमत्तेवर बांधकामास मनाई असताना परवानगी कशी दिली?आर.सी.एस.नं.१०२२×९१ देखील आहे. बांधकाम परवानगी का दिली. २००४-०५ चे नॉन ॲग्रीकल्चर प्रमाणपत्र नसताना परवानगी कशी दिली. या प्लॉटवर मनपाचे आरक्षण असताना परवानगी कशी दिली. अनधिकृत परवानगी दिली असताना ती रद्द का करण्यात आलेली नाही. सहा महिन्यापासून कार्यालयाकडे कार्यवाहीची मागणी करीत आहे. कार्यवाही होत नाही.

श्री.मुजीब खान : स.सदस्य यांनी एक मालमत्तेचा सर्व्हे नंबर दिला. ती जगा वक्फ बोर्डची येते. तेथे परवानगी कोणत्या बेसीसवर दिली? त्याची माहिती देण्यात यावी. आरक्षण असलेल्या मनपाच्या जगेवर बांधकाम परवानगी दिली असे इतर जगेच्या बाबतीत होऊ नये. त्याची चौकशी करून हे काम थांबले पाहिजे

श्री.नासेर नहदी : अनेक ठिकाणी वक्फ बोर्डची जगा आहे. अनेक लोकांकडे एन.ओ.सी. आहे तर त्यांना परवानगी देणार आहे का?

मा. आयुक्त : वक्फ बोर्डाचे सेक्रेटरींनी माझी भेट घेतली. यादी देण्याचे सांगितले. ते तपासून बांधकाम परवानगी देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

श्री.मुजीब खान : मा.गौतम साहेब आयुक्त असतांना वक्फ बोर्डच्या सर्व जगांची माहिती राजपत्राच्या प्रतीसह नगर रचना विभागास दिलेली आहे.

श्री.मिलिंद दाभाडे : नंदनवन कॉलनीतील ओपन स्पेसचा कोर्टात वाद चालू आहे. मनपाच्या बाजूने निकाल लागलेला असताना त्या ठिकाणी सध्या बांधकाम चालू आहे.

मा. सभापती : औकाफ बोर्ड, सालारजंग, बागशेरजंग व मनपाच्या इतर ठिकाणच्या ओपन स्पेसवर कुणी बांधकाम करीत असेल तसेच परवानगी दिली जत असेल तर हे चुकीचे आहे. स.सदस्य नासेर नहदी यांनी जे मुद्दा उपस्थित केला त्याचा खुलासा करावा.

सहा.संचालक न.र. : निर्मल असोसिएटला सर्व कागदपत्र तपासून परवानगी दिलेली आहे. समुचित आरक्षणाच्या माध्यमातून विकास अंतर्गत (अलीाविरींळीं ठशीशींरींळीं) २५% भाग कोणता घ्यायचा याबाबतचा निर्णय स्थायी समितीसमोर सुध्दा आलेला होता. प्रस्ताव मंजूर झाल्यानंतरच परवानगी देण्यात आलेली आहे.

मा. सभापती : कागदोपत्री खुलासा होणे अपेक्षित आहे. कुणाच्या दबावाखाली वैयक्तिक खुलासा देऊ नये. नियमानुसार काम झाले पाहिजे विना परवानगी बांधकाम झाले म्हणून मुंबईलाही पावसामुळे बिकट परिस्थिती निर्माण झालेली आहे. चौकशीचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले. म्हणूनच नियमाला धरूनच काम करावे.

श्री.दिलीप गायकवाड : दि.२९/७/२००४ रोजी मनपाने जहीर प्रगटनाद्वारे शहराच्या काही भागात अनधिकृतरित्या २०८३० चे प्लॉट पाडून विक्री करू नये असे कळविले होते. आजही अनेक भागात अनधिकृत बांधकाम व प्लॉट विक्री होत आहे त्यावर प्रशासन काय कार्यवाही करीत आहे? त्यात सर्व्हे नंबरही दिले.

मा.सभापती : प्रशासकीय अधिकारी यांनी सर्व्हे नंबरची नोंद घेऊन जे इमारत निरीक्षक यांचेकडून अहवाल घेऊन उप आयुक्त किंवा मा.आयुक्तांना ३ दिवसात अहवाल द्यावा. त्यानंतर छायाचित्रासह सभागृहासमोर सादर करावे.

सौ. लता दलाल : दारिद्र्य रेषेखालील सर्व्हे होत आहे. कोणत्या वार्डात कोणते कर्मचारी आहेत त्यांना नगरसेवकांशी संपर्क करण्याच्या सूचना द्याव्यात. काही नांवे नगरसेवकांकडे असतील तर देता येतील.

मा. सभापती : ऐनवेळी गुंठेवारी संबंधी प्रस्ताव आहे. मा.आयुक्तांना बैठकीसाठी जयचे आहे.

मा. आयुक्त : गुंठेवारी रेग्युलर करण्यासाठी ले-आऊट, सिटी सर्व्हे नकाशे हे तपासावे लागते. प्रत्येक भागात जऊन किती बांधकाम झाले याची माहिती घ्यावी लागते. तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांचेकडून हे काम होणार नाही. त्यासाठी प्रत्येक घराचे रू.१००/- प्रमाणे आकारणी करून सव्हह करून घ्यायचा त्यानंतर रू.२००/- शपथपत्र करावे लागते. तंतोतंत नकाशा व इतर कामास रू.५००/- असे मिळून ७००/- रूपये लागतील. असे केल्यास एकाच वेळी सर्व गुंठेवारीच्या ले-आऊटचा सर्व्हे करून घेऊ शकतो. ४-५ महिन्यामध्ये ते काम होईल. हे मंजूर झाल्यानंतर एजन्सी फायनल केली जईल.

मा. सभापती : विषयपत्रिकेवर चर्चा करावी. ऐनवेळचा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**विषय क्र. २९ :**

दि.२९/६/२००५ रोजे संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव :**

दिनांक २९/६/२००५ रोजे संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ३० :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेसाठी जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथे शुध्दीकरण प्रक्रियेत आवश्यक असणाऱ्या क्लोरीन गॅस पुरवठ्यासाठी अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची दरसूची २००४-०५ नुसार रूपये १८,७९,५००/- चे तयार करण्यात आले असून या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी स्थायी समिती सभेपुढे प्रस्ताव ठेवण्यासाठी दि.२७.६.२००५ अन्वये शिफारस केली आहे. आर्थिक वर्ष २००५-०६ च्या अर्थसंकल्पात पाणी पुरवठा रसायने खरेदीकरीता तरतुद करण्यात आली आहे. वर्ष २००५-०६ मधील वार्षिक क्लोरीन गॅस पुरवठ्यासाठी रू.१८,७९,५००/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेसाठी जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथे शुध्दीकरण प्रक्रियेत आवश्यक असणाऱ्या क्लोरीन गॅस पुरवठ्यासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.१८,७९,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१ :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेसाठी जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथे शुध्दीकरण प्रक्रियेत पाण्यातील गढूळता काढण्यासाठी आवश्यक असणारी तुरटी खरेदीसाठी अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची दरसूची २००४-०५ नुसार रूपये १४,४२,०००/- चे तयार करण्यात आले असून या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी स्थायी समिती सभेपुढे प्रस्ताव ठेवण्यासाठी दि.२७.६.२००५ अन्वये शिफारस केली आहे.

आर्थिक वर्ष २००५-०६ च्या अर्थसंकल्पात पाणी पुरवठा रसायने खरेदीकरीता तरतुद करण्यात आली आहे. वर्ष २००५-०६ मधील वार्षिक तुरटी खरेदीसाठी रू.१४,४२,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेसाठी जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथे शुध्दीकरण प्रक्रियेत पाण्यातील गढूळता काढण्यासाठी आवश्यक असणारी तुरटी खरेदीसाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.१४,४२,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२ :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेसाठी जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथे शुध्दीकरण प्रक्रियेत आवश्यक असणाऱ्या ब्लिचिंग पावडरच्या पुरवठ्यासाठी अंदाजपत्रक रूपये १६,५०,०००/- चे तयार करण्यात आले असून या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी स्थायी समिती सभेपुढे प्रस्ताव ठेवण्यासाठी दि.२७.६.२००५ अन्वये शिफारस केली आहे.

आर्थिक वर्ष २००५-०६ च्या अर्थसंकल्पात पाणी पुरवठा रसायने खरेदीकरीता तरतुद करण्यात आली आहे. वर्ष २००५-०६ मधील वार्षिक ब्लिचिंग पावडर खरेदीसाठी रू.१६,५०,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेसाठी जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथे शुध्दीकरण प्रक्रियेत आवश्यक असणाऱ्या ब्लिचिंग पावडरच्या खरेदीसाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.१६,५०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३ :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केला की, संजयनगर भागात विविध ठिकाणी १०० मी.मी. व्यासाची डी.आय.के.-७ जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन २००४-०५ च्या दरसूचीनुसार रक्कम रूपये ३,४९,०८२/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आली. कार्यालयाची निविदा सूचना ज.क्र.३/०५ जी की, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येऊन बी-१ निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विकण्याच्या अंतिम तारखेपर्यंत फक्त एक निविदा विक्री झाली व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एक सिलबंद निविदा श्री.सुरेश बी.साधवानी यांची अं.प.दरापेक्षा २६.५% जस्त दराची प्राप्त झाली.

ठेकेदार श्री.सुरेश बी. साधवानी यांनी दिलेला दर कार्यालयास जस्तीचा वाटत असल्यामुळे ठेकेदारास राबाबत वाटाघाटीसाठी मा.आयुक्त यांचे दालनात दि.१.७.२००५ रोजी बोलविण्यात आले. वाटाघाटीच्या वेळी ठेकेदाराने उक्त काम अं.प.दरापेक्षा २१% जस्त दराने करण्यास संमती दिली असून, त्यास मा.स्थायी समिती सभेमध्ये प्रस्ताव ठेवणेसाठी मा.आयुक्तांची शिफारस झालेली आहे. तरी वाटाघाटी अंती ठरल्यानुसार श्री.सुरेश बी.साधवानी यांची अं.प.दरापेक्षा २१% जस्त दराची निविदा मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.रेणुकादास वैद्य : जुन्या डी.एस.आर.प्रमाणे काम केले जते. नवीन डीएसआर दरानुसार कार्यवाही करावी. जेणे करून निविदा ५०-५५% जस्त दराच्या येणार नाहीत.

मा. सभापती : स.सदस्यांनी जी सूचना केली त्यासंबंधी इतर विभागाचे जेडी.एस.आर.असतील त्याची माहिती सभागृहासमोर ठेवावी.

श्री.कंवरसिंग बैनाडे : विषय क्र.३३, ३४, ३५ मध्ये २६.५% जस्त दराच्या निविदा प्राप्त आहेत. हा जनतेचा पैसा आहे. दोन्ही प्रस्ताव स्थगित करावे. पुन्हा निविदा मागविण्यात याव्या. यास माझा विरोध आहे.

मा. सभापती : कार्यकारी अभियंता यांनी विषय क्र.३३, ३४, ३५ चा एकत्रित खुलासा करावा. मटेरीयल कॉस्ट व लेबर चार्जेस किती?

कार्य.अभि.(पा.पु.) : विषय क्र.३३, ३४, ३५ या प्रस्तावात २६.५% जस्त दराची निविदा होती. वाटाघाटी करून २१% जस्त दरास मान्यता मिळाली व शिफारस केली आहे. २१% जस्तीचे दर असले तरी मार्केट दराप्रमाणे जवळपास अं.प.दराप्रमाणेच येत आहे. डी.एस.आर.चे दर व मार्केटचे दर यात भरपूर तफावत असल्यामुळे अशी कामे करण्यास कुणी पुढे येत नाही. पाईपचे दर व लेबर रेट वेगळे करून त्याचेएकत्रित अंदाजपत्रक तयार करून निविदा मागच्या वर्षी प्रमाणे मागविण्यात येईल. दोन ते तीन वेळेस रिकॉल झालेले आहे.

मा. सभापती : विषय क्र.३३, ३४, ३५ च्या बाबतीत ए.सी.पाईपचा प्रस्ताव तयार करून त्वरीत सादर करावे.

श्री.मुजीब खान : आजच्या परिस्थितीत किती खर्च येणार आहे त्याप्रमाणे अंदाजपत्रक सादर केले पाहिजे यानंतर नवीन डीएसआर दरानुसार प्रस्ताव सादर करावे. वार्डात विकासाची कामे थांबलेली आहेत.

मा. सभापती : एम.जेपी. चा डी.एस.आर. पाणी पुरवठ्याच्या कापमासाठी वापरला जतो. शासनाचे आदेशाप्रमाणे निविदा काढल्या जतात. मार्केट रेट घेऊन वाटाघाटी करता येत नाही. ए.सी. लाईनचे काम त्वरीत होण्याच्या दृष्टीकोनातून स.सदस्यांची अडचण व जनतेला मिळणारा फायदा हा दृष्टीकोन ठेवून त्वरीत नवीन अंदाजपत्रक तयार करून शॉर्ट टेंडर नोटीस काढून पुढील स्थायी समितीसमोर सादर करावे.

**<u>ठराव :</u>**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार संजयनगर भागात विविध ठिकाणी १०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकण्याचे कामाकरीता कामे त्वरीत होण्याच्या दृष्टीने डी.आय.के.-७ ऐवजी ए.सी.पाईपचे अंदाजपत्रक तयार करून शॉर्ट टेंडर नोटीस काढण्याची कार्यवाही करावी असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र. ३४ :</u>**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केला की, बनेवाडी (गाव) जलकुंभाकरीता १५० मी.मी.व्यासाची ए.सी. व डी.आय.के.जलवाहिनी टाकून, जलकुंभाची किरकोळ दुरूस्ती करणे आहे. त्यासाठी महाराष्ट्र जेवन प्राधिकरण विभागाची सन २००४-०५ च्या दरसूचीनुसार रक्कम रूपये ७,००,०००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आली. कार्यालयाची निविदा सूचना ज.क्र.३/०५ जी की, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येऊन बी-१ निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विकण्याच्या अंतिम तारखेपर्यंत फक्त एक निविदा विक्री झाली व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एक सिलबंद निविदा श्री.सुरेश बी.साधवानी यांची अं.प.दरापेक्षा २६.५% जस्त दराची प्राप्त झाली.

ठेकेदार श्री.सुरेश बी. साधवानी यांनी दिलेला दर कार्यालयास जस्तीचा वाटत असल्यामुळे ठेकेदारास राबाबत वाटाघाटीसाठी मा.आयुक्त यांचे दालनात दि.१.७.२००५ रोजी बोलविण्यात आले. वाटाघाटीच्या वेळी ठेकेदाराने उक्त काम अं.प.दरापेक्षा २१% जस्त दराने करण्यास संमती दिली असून, त्यास मा.स्थायी समिती सभेमध्ये प्रस्ताव ठेवणेसाठी मा.आयुक्तांची शिफारस झालेली आहे. तरी वाटाघाटी अंती ठरल्यानुसार श्री.सुरेश बी.साधवानी यांची अं.प.दरापेक्षा २१% जस्त दराची निविदा मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार बनेवाडी (गाव) जलकुंभाकरीता १५० मी.मी.व्यासाची ए.सी. व डी.आय.के.जलवाहिनी टाकून, जलकुंभाची किरकोळ दुरूस्ती करणेच्या कामाकरीता कामे त्वरीत होण्याच्या दृष्टीने डी.आय.के. ऐवजी ए.सी.पाईपचे अंदाजपत्रक तयार करून शॉर्ट टेंडर नोटीस काढण्याची कार्यवाही करावी असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र. ३५ :</u>**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केला की, श्रीनगर उल्कानगरी येथे १०० व २०० मी.मी.व्यासाची ए.सी. व डी.आय.के.-७ जलवाहिनी टाकणे आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन २००४-०५ च्या दरसूचीनुसार रक्कम रूपये ४,५०,८२२/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आली.

कार्यालयाची निविदा सूचना ज.क्र.३/०५ जी की, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येऊन बी-१ निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विकण्याच्या अंतिम तारखेपर्यंत फक्त एक निविदा विक्री झाली व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एक सिलबंद निविदा श्री.सुरेश बी.साधवानी यांची अं.प.दरापेक्षा २६.५% जस्त दराची प्राप्त झाली.

ठेकेदार श्री.सुरेश बी. साधवानी यांनी दिलेला दर कार्यालयास जस्तीचा वाटत असल्यामुळे ठेकेदारास राबाबत वाटाघाटीसाठी मा.आयुक्त यांचे दालनात दि.१.७.२००५ रोजी बोलविण्यात आले. वाटाघाटीच्या वेळी ठेकेदाराने उक्त काम अं.प.दरापेक्षा २१% जस्त दराने करण्यास संमती दिली असून, त्यास मा.स्थायी समिती सभेमध्ये प्रस्ताव ठेवणेसाठी मा.आयुक्तांची शिफारस झालेली आहे. तरी वाटाघाटी अंती ठरल्यानुसार श्री.सुरेश बी.साधवानी यांची अं.प.दरापेक्षा २१% जस्त दराची निविदा मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार श्रीनगर उल्कानगरी येथे १०० व २०० मी.मी.व्यासाची ए.सी. व डी.आय.के.-७ जलवाहिनी कामाकरीता कामे त्वरीत होण्याच्या दृष्टीने डी.आय.के. ऐवजी ए.सी.पाईपचे अंदाजपत्रक तयार करून शॉर्ट टेंडर नोटीस काढण्याची कार्यवाही करावी असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र. ३६ :</u>**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी प्रस्ताव सादर करीत आहे की, मनपाचे एकूण २४ आरोग्य केंद्र व १ रूग्णालय तसेच आरोग्य व कुटुंब कल्याण सेक्टर इन्व्हेस्टमेंट समिती अंतर्गत युरोपीयन कमिशनच्या अर्थ सहाय्याने ४ रूग्णालय असे एकूण ५ रूग्णालयातून २४ तास बाळांतपणाची सेवा व २ रूग्णालयात कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया, सिझेरीन शस्त्रक्रिया सेवा उपलब्ध आहे. उर्वरीत ३ रूग्णालयात सदरील सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

सन २००२ पासून महानगरपालिका, आरोग्य विभागातर्फे युरोपीयन कमिशन अर्थ सहाय्यीत सेक्टर इन्व्हेस्टमेंट आर.सी.एच. प्रकल्प राबविला जत आहे. या प्रकल्पा अंतर्गत महानगरपालिकेच्या खालील आरोग्य केंद्रांचे श्रेणीवर्धन करण्यात आलेले आहे.

१. सिडको एन-८ रूग्णालय
२. सिल्कमील रूग्णालय
३. बन्सीलालनगर रूग्णालय
४. सिडको एन-११ रूग्णालय
५. कैसर कॉलनी रूग्णालय

या दवाखान्यातून पुरविण्यात येणाऱ्या आरोग्य सेवा व सुविधा यामध्ये वाढ करण्यात आलेली आहे. या अनुषंगाने यंत्र सामुग्री, साधन सामुग्री व इतर आवश्यक औषधी व साहित्य तसेच लागणारे तज्ञ मनुष्यबळ या ही खर्चात वाढ झालेली आहे. मनपाचे १ रूग्णालय व प्रकल्पाचे ४ रूग्णालयावर होणारा खर्च मनपा व युरोपीयन कमिशनच्या अर्थसहाय्यातून भागविला जतो. मा.सर्वसाधारण सभा दि.२०.०३.१९९९ ठराव क्र.२४९ नुसार प्रकलप संपल्यावर सर्व आर्थिक भार महानगरपालिका सोसणार आहे. हा वाढलेला खर्च मनपास उचलावा लागेल. तसेच आरोग्य संस्थेकडून उपचार घेणाऱ्या रूग्णांची संख्या सातत्याने वाढत असून खर्चाचा भार काही प्रमाणात कमी करण्याच्या दृष्टीने रूग्णांनी काही प्रमाणात उचलणे आवश्यक आहे. या सर्व बाबींचा विचार करून निरनिराळ्या वैद्यकीय सुविधांसाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्क दराबाबत प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | सेवा/सुविधा | शासनाचे मंजूर दर (रूपये) | मनपाचे सध्याचे दर(रूपये) | प्रस्तावित दर (रूपये) |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | बाह्यरूग्ण नोंदणी (७ दिवसांकरिता) | ५ | ५ | ५ |
| २ | आंतररूग्ण | | | |
| | आंतररूग्ण शुल्क प्रति दिन | १० | - | १० |
| ३ | प्रयोगशाळा चाचण्या | | | |
| | अ) रक्त चाचणी (प्रत्येकी) | १५ | ५ | १५ |
| | १. हिमोग्लोबिन | - | ५ | ५ |
| | २. टिएलसी | - | - | - |
| | ३. डीएलसी | - | ५ | ५ |
| | ४. इएसआर | - | - | - |
| | ५. रक्तगट व आरएच टेस्टींग | - | २५ | २५ |
| | ६. रक्तातील रासायनिक द्रव्यांची चाचणी (शुगर, युरिया, प्रोटीन, सोडीयम, पोटॅशियम इ.) | - | - | - |
| | ब) लघवी, शौच, थुंकी इत्यादी ओपीडी चाचण्या | २० | ५ | २० |
| | क) इतर विशेष चाचण्या | २० | २५ | २० |
| | ड) सायटॉलॉजी | ३५ | - | ३५ |
| | फ) एलायझा चाचणी<br>१. सर्वसाधारण<br>२. नाको | ५०<br>१०<br>- | १०<br>-<br>- | ५०<br>१०<br>- |
| | ग) कल्चर सेन्सीटीव्हीटी | ४५ | - | ४५ |
| | घ) प्रेगनन्सी टेस्ट | ४५ | - | ४५ |
| ४ | क्ष-किरण विभाग | | | |
| | १. क्ष-किरण चाचणी (स्टँडर्ड) | ३० | - | - |
| | २. अल्ट्रा सोनोग्राफी - पूर्ण<br>अर्धा<br>विशेष | ५०<br>३०<br>१०० | -<br>-<br>- | १०० |
| | ३. ई.सी.जी. | २० | २५ | २५ |
| ५ | शस्त्रक्रिया | | | |
| | १. भूल देवून करण्यात येणाऱ्या मोठ्या शस्त्रक्रिया | १६० | - | १००० |
| | २. भूल देवून करण्यात येणाऱ्या छोट्या शस्त्रक्रिया | १६० | - | २०० |
| | ३. बाह्यरूग्ण विभागात करण्यात येणाऱ्या छोट्या शस्त्रक्रिया | ३० | - | १०० |
| ६ | बाळंतपणे | | | |
| | अ) पाहिले बाळंतपणे (प्रत्येकी) | निशुल्क | ५० | ५० |
| | ब) दुसरे बाळंतपण (प्रत्येकी) | ५० | १०० | १०० |
| | क) तिसरे बाळंतपण व पुढे (प्रत्येकी) | २५० | ५०० | ५०० |
| ७ | नर्सिंग होम चार्जेस | | | |
| | अ) नर्सिंग होम (वातानुकूलीत नसलेली रूम) | ७५ | - | १०० |
| ८ | रूग्णवाहिका शुल्क (प्रती कि.मी.) | ५ | - | मनपा दवाखान्या-तील रूग्ण वगळून इतर रूग्णांसाठी रू.५/- |
| ९ | वैद्यकीय प्रमाणपत्र | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | १. आजराचे प्रमाणपत्र (३ महिन्यापर्यंत) | २५ | - | २५ |
| | २. फिटनेस प्रमाणपत्र | ५० | - | ५० |
| | ३. रूग्णालयात भरती झाल्याचे प्रमाणपत्र | १० | - | १० |
| | ४. रूग्णालयातील डिसचार्जदिल्याचे प्रमाणपत्र | निशुल्क | - | निशुल्क |
| | ५. (अ)रूग्णपत्रिकेचे कागदपत्र देणे (५ पानापर्यंत)<br>(ब)पुढील प्रत्येक पानाकरिता (झेरॉक्स प्रती) | २०<br>१ | -<br>- | २०<br>१ |
| | ६. वैद्यकीय प्रतिपूर्ती मिळण्यासाठी प्रमाणपत्र | बिलाच्या ३% | - | बिलाच्या ३% |
| १० | बालकाच्या सेवा | | | |
| | १. नेबुलायझेशन | - | - | रू.५/-प्रतिदिन |
| | २. फोटो थेरपी युनीटस् | - | - | रू.५०/-प्रतिदिन |

शासन निर्णय क्र.जिरूफी१०.००/प्र.क्र.९०/२०००/आरोग्य-३ मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दि.१० जुलै २००१ नुसार ज्यांचे वार्षिक उत्पन्न रू.२०,०००/- किंवा त्याहून कमी आहे अशा रूग्णांना किंवा अन्न व नागरी पुरवठा विभागाने वितरीत केलेल्या पिवळ्या रेशनकार्ड धारक रूग्णांना दारिद्र्य रेषेखालील असे समजण्यात येईल व त्यांना मोफत आरोग्य सुविधा पुरविण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच शासनाच्या नियमाप्रमाणे गर्भवती स्त्रियांना मोफत आरोग्य सेवा देण्यात येईल. सोबत जेडलेल्या परिशिष्ट 'अ' प्रमाणे विनाशुल्क वैद्यकीय उपचाराची सोयी व सवलती देण्यात आलेल्या आहेत. करीता मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**परिशिष्ट - अ**

शासनाने वेळोवेळी काढलेल्या आदेशानुसार ज्या संवर्गांना विनाशुल्क वैद्यकीय उपचाराची सोयी/सवलत देण्यात आलेली आहे त्या संवर्गाबाबतचा तपशील :-

१. मनपाचे कर्मचारी व त्यांचेवर अवलंबून असणारे कुटूंबिय.
२. स्वातंत्र्यसंग्राम सैनिक व त्यांचे कुटुंबिय.
३. न्याय वैद्यकीय प्रकरणातील औषधोपचारासाठी पाठविलेल्या व्यक्ती.
४. पोलीसांतर्फे येणाऱ्या मेडिको लिगल केसेस.
५. सुधारगृहातील रूग्ण.
६. कुष्ठरोग मंडळाकडून येणारे रूग्ण.
७. महिला सुधारगृहातर्फे येणारे रूग्ण.
८. नागरी विभागातील बेवारशी मुले.
९. आश्रमशाळेतील रूग्ण.
१०. नगरसेवक, पदाधिकारी, मा.महापौर, आमदार व खासदार, मंत्री, सभापती व माजे आमदार.
११. न्यायाधिश.

**संवाद :**

श्री.गजनन बारवाल : ज्या व्यक्तीकडे पिवळे रेशन कार्ड आहे त्यांना दारिद्र्य रेषेखालील समजणार. अनेक लोकांकडे बी.पी.एल. चे कार्डच नाही. माझ्या वॉर्डात ४५० ते ५०० लोक त्यात येतात. जे गरीब आहेत, स्लम विभागात राहतात त्यांना सुध्दा सुविधा देण्यात याव्यात अशी विनंती आहे.

सौ. लता दलाल : या सुविधा युरोपीयन कमिशनच्या अर्थसाह्यामधून मिळतात का? जी तपासणी फी नमूद केली ती कमीत कमी आकारावी. पिवळे रेशन कार्ड अनेकांकडे सध्या

नाही. ज्यांचेकडे ते नाही परंतु त्यांची आर्थिक परिस्थिती बिकट आहे अशांसाठी सुध्दा या सुविधा देण्यात याव्यात. कार्डची सक्ती करू नये. नगरसेवकांचे पत्र घेवून सुविधा मिळत असतील तर तसे करावे.

श्री.रेणुकादास वैद्य : जे लोक दवाखान्यात येतील त्या सर्वांना या सवलती देण्यात याव्यात. गरीब लोकच मनपाच्या दवाखान्यात येतात. कमीत कमी शुल्क आकारावे.

श्री.दिलीप गायकवाड : दारिद्र्य रेषेचा सर्व्हे चालू असून ज्यांना पिवळे कार्ड दिले जईल त्यांनाच सुविधा मिळणार आहेत. सर्व्हेच्या आधारे कार्ड मिळणार आहे. ज्यांचेकडे असे कार्ड आहे त्यांनाच सवलत द्यावी.

श्री.मिलींद दाभाडे : भूल देऊन शस्त्रक्रिया करण्याचे यंत्र मनपाकडे आहे का? सोनोग्राफीचे मशीन आहे का?

आरोग्य वैद्य.अधिकारी : मनपाने ठरवून दिलेले दर व १० जुलै २००१ चे शासनाने ठरवून दिलेले दर त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करून व मनपाच्या दवाखान्यामध्ये सेवा सुविधा मध्ये भर पडल्यामुळे हा तक्ता तयार केला. यावर विचार करावा. युरोपीयन कमीशनचे अर्थसाह्य ४ वर्षेच मिळणार असून त्यानंतर मनपासच उत्पन्न जमा करून सुविधा द्याव्या लागणार आहेत. शासकीय दवाखान्या एवढेच दर आहेत. वाढ केलेली नाही.

श्री.मुजेब खान : कटकट गेट येथील ख्वाज गरीब नवाजहा मनपाचा मोठा दवाखाना आहे. ते यात नमूद केले नाही. ५ ऐवजी ६ करावे.

आरोग्य वैद्य.अधिकारी : युरोपीयन कमीशन अंतर्गत ६ दवाखान्याचे श्रेणीवर्धन करायचे असून ४ दवाखान्याचे श्रेणीवर्धन केलेले आहे. चिकलठाणा व बायजीपुरा भागातील २ दवाखान्याचे प्रस्ताव शासनाकडे गेलेले आहेत.

मा. सभापती : यामध्ये कटकट गेट येथील ख्वाज गरीब नवाज मनपा दवाखान्याचा समावेश करावा. हा स्लम भाग असून तेथे गरीब जनता राहते. मनपाच्या दवाखान्यात येणारा प्रत्येक नागरीक पैसे भरण्यास असमर्थ असतो. म्हणून कोणत्याही अटी-शर्ती न लादता प्राथमिक उपचार करावे. सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मनपाच्या दवाखान्यातून दिल्या जणाऱ्या सेवा सुविधांवरील खर्चाचा भार काही प्रमाणात कमी करण्याच्या दृष्टीने निरनिराळ्या वैद्यकीय सुविधांसाठी प्रस्तावित केलेले शुल्क आकारण्यास शुल्कास त्याचप्रमाणे कोणत्याही अटी-शर्ती न लादता उपचार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ३७ :</u>**

औरंगाबाद महानगरपालिका संचलित भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र औरंगाबाद येथे मानद समन्वयकाचे एक पद ११ महिन्याच्या मानधन रू.५०००/- व करार पध्दतीने भरण्यासाठी जहिरात देवून अर्जमागविण्यात आले.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४(१) अन्वये गठीत केलेल्या निवड समितीने सदरील अर्जधारक उमेदवारांच्या दि.१९.७.२००५ रोजी तोंडी मुलाखती घेण्यात आल्या. मुलाखतीसाठी एकूण २५ उमेदवार उपस्थित होते.

तोंडी मुलाखतीमध्ये उपस्थित उमेदवारांपैकी सरासरी गुणानुक्रमे असलेला उमेदवार श्री.जनार्धन उध्दवराव सोनवणे यांची मानद समन्वयक म्हणून ११ महिन्याच्या मानधन व करार पध्दतीवर निवड समितीच्या शिफारशीनुसार निवड करण्यात आलेली आहे.

करीता निवड समितीच्या शिफारशीनुसार निवड केलेले श्री.जनार्धन उध्दवराव सोनवणे यांना मानद समन्वयक पदी ११ महिन्यांसाठी नियुक्तीस मान्यता देण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.मिलींद दाभाडे : समन्वयक पदासाठी ज्यांची शिफारस केलेली आहे ते सेवानिवृत्त आहेत. जे सुशिक्षित बेरोजगार आहेत त्यांना संधी द्यावी.

मा. सभापती : प्रशासनाने प्रस्ताव ठेवलेला आहे. स.सदस्यांच्या सूचनांचा विचार करावा. पुन:र्विचारासाठी प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार औरंगाबाद महानगरपालिका संचलित भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र औरंगाबाद येथे मानद समन्वयाचे पदावर नियुक्ती करण्याचे संदर्भात प्रशासनाने केलेल्या शिफारशीवर पुन:र्विचार करून सुधारीत प्रस्ताव सादर करावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३८ :**

उप आयुक्त (महसूल) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, संत एकनाथ रंग मंदीर येथील कॅन्टीन चालविण्याचा ठेका देण्यासाठी निवदा सुचना ज.क्र./मनपा/मामअ/६१०/२००५ दि.१८.५.२००५ रोजी वर्तमानपत्रात जहीर प्रसिध्दी देऊन सिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या.

कोऱ्या निविदा विक्रीच्या नियोजित तारखेपर्यंत एकूण दोन कोऱ्या निविदा विक्री झाल्या होत्या तसेच सिलबंद निविदा स्विकारण्याच्या तारखेपर्यंत फक्त एक सिलबंद निविदा प्राप्त झाली असून ती खालील प्रमाणे आहे.

१. सौ.वैशाली प्रशांत बोधनकर रू.९२५०/- प्रती माह

सदर कामासाठी कार्यालयाने आधारभूत किंमत रू.८२३५/- प्रती माह असा दर ठरविला होता. प्रत्यक्षात प्राप्त निविदामध्ये सौ.वैशाली प्रशांत बोधनकर यांनी जस्तीचे दर रू.९२५०/- प्रती माह असा दर दिल्याने जस्तीच्या दराचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.रेणुकादास वैद्य : दोन निविदा विक्री झाल्या व एकच प्राप्त झाली. पारदर्शकता नाही. स्थगित ठेवावे.

श्री.गजनन बारवाल : मागील अनेक वर्षापासून गणेश शेट्टी या व्यक्तीने या ठिकाणी चांगली सेवा दिलेली आहे. वेळोवेळी भाडे सुध्दा वाढवून दिलेले आहे. त्यांना पुढे नियमित करून मुदतवाढ देण्यात यावी.

श्री.कंवरसिंग बैनाडे : श्री.शेट्टी यांनी चांगली सेवा दिलेली आहे त्यांचा विचार व्हावा. आजपर्यंत कोणतीही तक्रार आलेली नाही. जे काही भाडेवाढ असेल ती करून संबंधीतास मुदतवाढ देण्यात यावी.

श्री.गजनन बारवाल : संबंधीतांनी मुदतवाढ देण्याची मागणी केलेली आहे तसे लेखी अर्ज देखील दिलेली आहे. तरीसुध्दा निविदा काढण्यात आली. संत एकनाथ रंगमंदीरात फारसे कार्यक्रम होत नाहीत. श्री.गणेश शेट्टी यांना कॅन्टीन चालविण्यासाठी मुदतवाढ देण्यात यावी.

मा. सभापती : एकच निविदा प्राप्त झाली. तसेच स.सदस्यांच्या भावना लक्षात घेता दुरूस्ती सुचविण्यात येते. मनपा मुख्य कार्यालयात कॅन्टीनची व्यवस्था नाही. येथेही कॅन्टीनची आवश्यकता आहे. उप आयुक्त (म) यांनी दोन्ही कॅन्टीनचा प्रस्ताव तयार करून पुन्हा निविदा मागविण्यात याव्यात. सर्व बाबी तपासून प्रस्ताव ठेवावा. हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येत आहे.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सर्व बाबी तपासून प्रस्ताव ठेवावा. पुन्हा निविदा मागविण्यात याव्यात. सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३९ :**

औरंगाबाद शहरातील विविध रस्त्यावरील पथदिव्यांची दुरुस्ती व देखभाल वार्षीक करारपध्दतीवर देण्याचे प्रस्तावीत आहे. सदर प्रस्ताव करारानुसार शहरातील पथदिव्याची पहाणी, देखभाल दुरुस्ती, वेळेत दिवे चालू बंद करणे, आवश्यक दुरुस्ती करुन शहरातील सर्व दिवे चालू करणे इत्यादी बाबींचा समावेश आहे. बारा महिने देखभाल दुरुस्ती जी एजन्सी करेल त्या एजन्सीला पुढील महिन्यात अतिरिक्त एक महिना कालावधी साठी विना मोबदला (Free of cost) देखभाल दुरुस्ती करणे व पथदिवे बदलून देणे बंधनकारक राहील.

पथदिवे ठेका पध्दतीने चालू बंद करणे, आवश्यक ती दुरुस्ती करुन सर्व दिवे चालू करणे इत्यादी कामासाठी खालील अटी शर्ती वर काम देण्यात येईल.

१. गुत्तेदारास शहरातील पथदिवे चालू बंद करण्याचे काम विद्युत विभागाकडून दर महा मिळणाऱ्या वेळापत्रका प्रमाणे करणे आवश्यक आहे. पथदिवे वेळापत्रका प्रमाणे चालू बंद न केल्यास वाढीव येणारे युनिट महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे दराने भरणा करण्याची जबाबदारी गुत्तेदाराची (एजन्सीची) राहील.

२. शहरातील पथदिवे चालू व बंद करतांना एखाद्या प्रभागातील/भागातील संपुर्ण पथदिवे तांत्रिक कारणामुळे बंद आढळल्यास विद्युत विभागास लेखी स्वरुपात कळविण्यात यावे व महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या मदतीने चोविस तासाच्या आत चालू करुन घ्यावे.

३. गुत्तेदारास बंद असलेले पथ दिवे सुरु करण्यासाठी आवश्यक असलेले विद्युत साहीत्य, आय.एस.आय. मार्क असलेले व महानगरपालिका सद्यस्थितीत वापरत असलेल्या दर्जाचे, पी.डब्ल्यू.डी.इलेक्ट्रीकल डिव्हीजनचे मान्यता प्राप्त कंपन्यांचे असावे, तसेच पथदिवे फिलीप्स, बजाज, जीईसी इत्यादी आय.एस.आय. मार्क असलेल्या कंपन्यांचे वापरणे बंधनकारक असेल.

४. शहरातील सर्व पथदिवे प्रत्येक रात्री चालू करणे आवश्यक आहे. एखादा दिवा ४८ तासात दुरुस्त/चालू झाला नाही तर त्या पथदिव्यासाठी मंजुर निविदा दराच्या दुप्पट दराने दंडाची आकारणी करण्यात येईल व तो दंड भरणे एजन्सीला बंधनकारक राहील.

५. गुत्तेदार/एजन्सी कडील सदर काम करण्यासाठी नियुक्त केलेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे विद्युत संपर्काचे संदर्भातील व अन्य अपघातामुळे होणाऱ्या जिवीत व वित्त हानीस सर्वस्वी गुत्तेदार/एजन्सी जबाबदार राहील. या कामी नियुक्त केलेल्या व कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची यादी सादर करणे बंधनकारक राहील. या सर्व कर्मचाऱ्यांना ओळखपत्र देणे व कर्मचाऱ्यांचा विमा काढणे आवश्यक आहे. या कामासाठी नियुक्त तारतंत्री कर्मचारी काम करणेसाठी आवश्यक असलेली शैक्षणीक अर्हता धारण करीत असल्याचे शैक्षणीक कागदपत्रे सादर करणे गुत्तेदारास बंधनकारक राहील.

६. गुत्तेदाराने देखभाल दुरुस्तीचे कामाचा झोन निहाय दैनंदिन कामाचा कार्यवाही अहवाल विद्युत विभागाकडे सादर करणे बंधनकारक राहील. सदरील अहवाल सादर न केल्यास त्यांचे विरुध्द अट क्र.४ प्रमाणे दंडाची कार्यवाही करण्यात येईल.

७. गुत्तेदारास मासिक अहवालानुसार १० दिवसात दरमहा बील सादर करणे बंधनकारक आहे.

८. गुत्तेदारास विद्युत परवाना शासकीय 'अ' वर्गात नोंदणीकृत असणे, विक्रीकर व संस्था नोंदणी दाखलाधारक असणे बंधनकारक आहे.

९. शहरातील ज्या महानगरपालिका/महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे पोलवर फिटींग आहे, अश्या पोलवर क्रमांक, वॉर्ड क्रमांक टाकणे, ठेकेदारास बंधनकारक राहील.

१०. जुने, खराब, वापरात न येणारे, बदलेले विद्युत साहीत्य महानगरपालिका विद्युत भांडारात जमा करुन त्याची पोच घेणे गुत्तेदारास बंधनकारक असेल. याबाबत पुर्तता केली असल्याचे पोच पावती देयकासह सादर करणे बंधनकारक राहील. असे साहित्य जमा न केल्यास त्याचे रक्कमेची वसूली देयकातून करण्यात येईल.

११. विद्युत/पथदिवे दुरुस्तीसाठी गुत्तेदारास महानगरपालिकेकडून कोणतेही दुरुस्ती वाहने उदा. शिडी, टॉवर लॅडर वाहन याचा पुरवठा करण्यात येणार नाही. या सर्व बाबी गुत्तेदारास आपले खर्चाने व स्वत:ची वापरावी लागतील. महानगरपालिके तर्फे याबाबत कोणताही मोबदला मिळणार नाही.

१२. वापरण्यात येणाऱ्या विद्युत साहीत्याचे देयक, जकात पावती व चाचणी प्रमाणपत्र संबंधीत ठेकेदारास महानगरपालिकेकडे सादर करणे बंधनकारक राहील.

१३. कोणत्याही अटी/शर्तींचे कंत्राटदार/एजन्सीने उल्लघन केल्यास करार रद्य करण्याचा अधिकार महानगरपालिका आयुक्त यांना राहील.

१४. सार्वजनिक हीत लक्षात घेऊन विना नोटीस करारनामा ठेका रद्य करण्याचा अधिकार महानगरपालिका आयुक्त यांना राहील.

१५. गुत्तेदाराकडील कोणत्याही कर्मचाऱ्यास महानगरपालिकेकडून कोणताही मोबदला/वेतन देय असणार नाही किंवा त्यांना सेवेत समाविष्ठ करण्याचा अधिकार राहणार नाही.

१६. प्रतिवर्षी होणारी नविन पथदिव्यांची वाढ संबंधीत ठेकेदारास लेखी कळविण्यात येईल.

१७. मुख्य रस्त्यावर महानगरपालिकेने बसविलेले व आस्तित्वात असलेले अंदाजे ५००० पथदिवे काढुन त्या ठिकाणी उर्जा बचत होणारी उपकरणांसह असलेले पथदिवे (Energy Saving Devices for external lighting system and load monitoring system.) बसविण्याचे काम अन्य एजन्सी मार्फत करण्याचे महानगरपालिकेचा प्रस्ताव भविष्यात आहे. त्यामुळे या मुख्य रस्त्यावरील पथदिवे बाबत भविष्यात प्रस्ताव हाती घेतल्यास सदरील देखभाल दुरुस्तीचा प्रस्तावातून सदरील पथदिवे वगळण्यात येतील व वर नमूद केल्याप्रमाणे मुख्य रस्त्यावरील काढलेले पथदिवे फिटींग (Light fitting) वार्षिक देखभाल दुरुस्तीचे काम घेणाऱ्या ठेकेदार/एजन्सीला विकत देण्यात येतील. सदरील चालूस्थितीतील लाईट फिटींग विकत घेण्याचे दर ठेकेदार/एजन्सीला खालील नमुन्यात वेगळे नमूद करावे लागतील.

| अ.क्र. | फिटींगचे वर्णन | फिटींग विकत घेण्याचे दर (प्रति फिटींग) |
|---|---|---|
| १ | २ | ३ |

सदर लाईट फिटींग देखभाल दुरुस्तीच्या कामी आवश्यक त्या ठिकाणी गुत्तेदारास वापरता येतील.

१८. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती व महाराष्ट्र शासनाचे विज बचतीचे धोरण याचा विचार करता विद्युत देखभाल दुरुस्ती ठेकेदारा मार्फत होत असतांना स्वेच्छा निधीतून शहरामध्ये नवीन पथदिवे बसविता येणार नाहीत.

१९. खाजगीकरण करण्यासाठी स.नगरसेवकांच्या निधीतून रक्कम रुपये २५,०००/- प्रत्येकी वळीत करण्यासाठी प्रस्तावीत करण्यात येत आहे.

२०. गुत्तेदार अट क्र. १ ते १८ मध्ये नमूद केलेल्या अटींचे अधीन राहून विविध रस्त्यावरील पथदिव्यांची दुरुस्ती देखभाल, पथदिवे चालू बंद करणे आवश्यक ती दुरुस्ती करुन, शहरातील पथतदिवे चालू करणे इत्यादी कामासाठी प्रति फिटींग साठी प्रतिनग दराप्रमाणे निविदा सादर करेल.

| अ.क्र. | फिटींगचे वर्णन | आस्तित्वातील पथदिव्यांची अंदाजे संख्या (नग) | दर |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | ४० वॅट टयूब लाईट फिटींग | १०,१०० | |
| २. | ७० वॅट सोडियम फिटींग | ८९५ | |
| ३. | १५० वॅट सोडियम फिटींग | ३८९२ | |
| ४. | २५० वॅट सोडियम फिटींग | ८७०० | |
| ५. | १२५ वॅट मर्क्यूरी फिटींग | १३९८ | |
| ६. | २५० वॅट मर्क्यूरी फिटींग | ४९५ | |
| ७. | ४०० वॅट हायमस्ट वरील दिवे | १३८ | |
| ८. | स्ट्रिट लाईट चालू बंद करणे | ५०० पॉईंट | |
| ९. | मनपाने पुरवठा केलेले विविध नविन फिटींग निविन | आवश्यकते नुसार | |

| | | | |
|---|---|---|---|
| | खांबावर बसविणे. | | |

सद्यस्थितीत आस्तित्वात असलेल्या खांबावरील सर्व फिटींगची माहिती खालील प्रमाणे आहे

| अ. क्र. | दिव्याचा प्रकार | शहरात बसविलेल्या एकुण दिव्यांची संख्या | दररोजच्या दिव्याचा वापर (तासात) | एका दिव्याचे एक दिवसाचे वापरासाठी येणारे युनिट | एकुण दिव्यासाठी येणारे एक दिवसाचे युनिट | विजेच्या दराचा सरासरी | एक दिवसाचे विज बिल एका दिव्याचे (रु.मध्ये) | एकुण दिव्यांचे एक दिवसाचे (रु.मध्ये) | एकुण दिव्याचे मासीक वीज बिल (रु.मध्ये) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ४० वॅट ट्यूब | १०,१०० | ११ | ०.४४ | ४४४४ | ३ रु. | १.३२ | १३३३२.०० | ३९९९६० |
| २. | ७० वॅट सोडीयम | ८९५ | ११ | ०.७७ | ६९९.१५ | ३ रु | २.३१ | २०९७.४५ | ६२९३६ |
| ३. | १५० वॅट सोडीयम | ३८९२ | ११ | १.६५ | ६४२१.८० | ३ रु. | ४.९५ | १९२६५.४० | ५७७९६२ |
| ४. | २५० वॅट सोडीयम | ८७०० | ११ | २.७५ | २३९२५.०० | ३ रु. | ८.२५ | ७१७७५.०० | २१५३२५० |
| ५. | १२५ वॅट मर्क्यरी | १३९८ | ११ | १.३७५ | १९२२.२५ | ३ रु. | ४.१२ | ५७६६.७५ | १७३००३ |
| ६. | २५० वॅट मर्क्यरी | ४९५ | ११ | २.७५ | १३६१.२५ | ३ रु. | ८.२५ | ४०८३.२५ | १२२५१३ |
| ७. | ४०० वॅट हायमास्ट व सेमी हायमास्ट | १३८ | ११ | ४.४० | ६७०.२० | ३ रु. | १३.२० | १८२१.६० | ५४६४८ |
| | | | | | | | | | **एकुण:- ३५,४४,२७२/-** |
| | | | | | | | | | **म्हणजेच रुपये ३५.५० लक्ष** |

उपरोक्त सर्व फिटींग चालू केल्यास महानगरपालिकेस येणारे मासीक बील रुपये ३५.५० लक्ष इतके येऊ शकेल.

वरील सर्व बाबींसह प्रस्ताव मा.स्थायी समिती समिती सभे समोर विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.विनायक पांडे : सहा वॉर्ड कार्यालये झाली. प्रत्येक वॉर्ड कार्यालयाचे क्षेत्रासाठी स्वतंत्र ठेका देण्यात यावा. एकाच ठेकेदारास दिले तर नगरसेवकांना त्याचे मागे फिरावे लागेल.

मा. सभापती : संपूर्ण शहरासाठी न करता वॉर्ड कार्यालयाचे क्षेत्रानुसार वेगवेगळ्या निविदा काढण्यात याव्या. या दुरूस्तीसह प्रस्ताव मंजूर करण्यात येतो. सर्वांचा हेतु पारदर्शक आहे. वेगवेगळे ठेकेदार मिळावेत. चांगले काम होण्याच्या व स्पर्धा होण्याच्या दृष्टीने ते योग्य होईल.

श्री.रविकांत गवळी : क्रमांक १९ मध्ये दिले खाजगीकरण करण्यासाठी २५,०००/- स्वेच्छा निधीतून वळती करणार, कशासाठी? कमी करून मंजूर करावे.

श्री.शशांक विसपुते : स्वेच्छा निधीतून पथदिवे बसविता येणार नाही असे दिले.

मा. सभापती : स्वेच्छा निधीतून कोणते ठेकेदाराने कोणते पथदिवे बसविले हे समजणार नाही. नवीन भागात वापरता येईल. अट क्र.१९ रद्द करून वार्ड कार्यालय निहाय करावे.

श्री.मिलींद दाभाडे : जेथे महापुरूषांचे पुतळे आहेत तेथे स्वेच्छा निधी वापरण्याची परवानगी असावी.

श्री.रविकांत गवळी : अनधिकृत भाग असेल तर स्वेच्छा निधी वापरणा येणार नाही का?

श्री.मुजेब खान : जेथे लहान गल्ल्या आहे, चौक आहे आवश्यक वाटल्यास अशा ठिकाणी स्वेच्छा निधीतून पथदिवे बसवू शकतात. मंजुरी द्यावी.

सौ.लता दलाल : स्वेच्छा निधी वापरण्याची परवानगी द्यावी. गणेशोत्सव, नवरात्रोत्सव कसे करणार?

श्री.गजनन बारवाल

श्री.अजिजजहागिरदार : नवीन पोलसाठी बजेटमध्ये तरतुद नाही. एक दोन ठिकाणी पथदिवे लावण्याची गरजपडल्यास त्यासाठी मान्यता द्यावी.

श्री.रेणुकादास वैद्य : सौर उर्जेवर कन्व्हर्ट करू शकतो. परंतु आजच्या स्थितीत लावण्याची परवानगी द्यावी.

मा. सभापती : स्वेच्छा निधीतून लाईट लावण्याची परवानगी देण्यात येते. क्र.१९ ही अट रद्द करण्यात येत आहे. या दुरूस्तीसह मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार औरंगाबाद शहरातील रस्त्यावरील पथदिव्यांचे देखभाल दुरूस्तीचे काम वार्षिक करार पध्दतीने देण्यासाठी प्रस्तावातील क्र.१९ ही अट रद्द करण्यात यावी तसेच वॉर्ड कार्यालयाचे कार्यक्षेत्रानिहाय वेगवेगळ्या निविदा काढण्यात याव्यात या दुरूस्तीसह मान्यता देण्यात येते. स्वेच्छा निधीतून लाईट लावण्याची परवानगी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४० :**

शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगपुरा येथे साईट क्र.६२ पार्कसाठी जगा आरक्षित असून सदरील जगा महानगरपालिकेच्या ताब्यात आलेली आहे. उपरोक्त जगा जवळपास ६५०० चौ.मी. एवढी आहे. या ठिकाणी पार्क विकसित करणे, खुल्या जगेस संरक्षित करणे इत्यादी कामे करण्यासाठी सन २००५-२००६ च्या अर्थसंकल्पात तरतुद करण्यात आलेली आहे. त्यासाठी रक्कम रू.२५.०० लाख एवढी तरतुद आहे. हा भाग शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी येत आहे. नव्याने पार्क विकसित करणे आणि त्या अनुषंगाने इतर कामे करण्यासाठी वास्तुविशारद श्री.एन.आर. वर्मा यांच्या नांवास मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. श्री.एन.आर. वर्मा यांच्याकडून उपलब्ध जगेच्या क्षेत्रानुसार महानगरपालिकेकडून दिलेल्या सूचनेनुसार सविस्तर नियोजन करणे, नियोजनाचा आराखडा महानगरपालिकेकडून मंजूर करून घेऊन नकाशे तयार करून घेणे, नकाशाची ट्रेसिंग दोन अमोनिया प्रिंटसहीत सादर करणे, नकाशामध्ये बांधकाम करावयाच्या प्रकल्पाचे प्लॅन इलिव्हेशन दोन बाजूचे छेद व इतर आवश्यक माहिती आणि स्ट्रक्चरल डिझाईन कामाचे अंदाजपत्रक तयार करणे व कामावर देखरेख करणे ही कामे करून घेण्यात येतील. यासाठी वास्तुविशारद श्री.एन.आर. वर्मा यांना अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १.५% रक्कम ही वास्तुशास्त्रज्ञ फिस देण्यात येईल. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

शहर अभियंता : औरंगपुरा येथे सुराणा बिल्डींगच्या मागे वकास आराखड्यानुसार उद्यानासाठी जगा आरक्षित आहे. ६५०० चौ.मी. जगा आहे. तेथे उद्यान विकसित करणार आहोत. मा.न्यायालयाचा निकाल मनपाच्या बाजुने लागला आहे.

श्री.अजिजजहागिरदार : नेपाळी लोकांना स्वेटरच्या दुकानासाठी ही जगा देण्यात येत असे. त्यांना जगा दिली नाही तर पुन्हा बस स्टँड रोडवर दुकाने टाकतील.

श्री.गजनन बारवाल : जगा त्यांना दिलीच पाहिजेअसे काही नाही. यापुर्वी जगा उपलब्ध होती म्हणून देण्यात आलेली होती.

श्री.कंवरसिंग बैनाडे : प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नाही.

श्री.नासेन नहदी : वाणिज्य वापरासाठी उपयोग करावा. मोक्यावर जगा आहे.

मा. सभापती : प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगपुरा येथे साईट क्र.६२ पार्कसाठी आरक्षित जगेवर नव्याने पार्क विकसित करणे आणि त्या अनुषंगाने इतर कामे करण्यासाठी वास्तुविशारद श्री.एन.आर. वर्मा यांची नियुक्ती करण्यास व त्यांना अं.प. रक्कमेच्या १.५% रक्कम ही वास्तुशास्त्रज्ञ फिस म्हणून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१ :**

उप आयुक्त (महसूल) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पैठणगेट वाहनतळ येथील फी वसुली करण्याचा ठेका देण्यासाठी निविदा सुचना ज.क्र./मनपा/मामअ/६०८/२००५ दि.१८.५.२००५ अन्वये वर्तमानपत्रात जहीर प्रसिध्दी देऊन सिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या.

कोऱ्या निविदा विक्रीच्या नियोजित तारखेपर्यंत एकूण चार कोऱ्या निविदा विक्री झाल्या होत्या तसेच सिलबंद निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या असून त्या खालील प्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १. शेख अय्युब शेख अफसर | रू.३०००/- प्रती माह |
| २. खान जहाँगीर सौदागर एजन्सीज | रू.११२५१/- प्रती माह |

सदर कामासाठी कार्यालयाने आधारभुत किंमत रू.१९८०/- प्रती माह असा दर ठरविला होता. प्रत्यक्षात प्राप्त निविदामध्ये श्री.खानजहाँगीर सौदागर एजन्सी यांनी जस्तीचे दर रू.११२५१/- प्रती माह असा दर दिल्याने जस्तीच्या दराची निविदा स्विकृतीच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

संवाद :

श्री.कंवरसिंग बैनाडे : अनामत रक्कम किती घेणार याचा उल्लेख नाही. किती वेळासाठी देणार आहोत याबाबत खुलासा करावा.

मा. सभापती : पार्कींगच्या जगेचा ठेका देणाऱ्या एजन्सीकडून नॅशनलाईजबँकेची गॅरंटी घेण्यात यावी. प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पैठणगेट वाहनतळ येथील फी वसुली करण्याचा ठेका देण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या जस्त म्हणजेच प्रतीमाह रू.११२५१/- या दराच्या श्री.खान जहाँगीर सौदागर एजन्सी यांची निविदा स्विकारण्यास नॅशलाईजबँकेची गॅरंटी घेण्याच्या अटीवर मंजुरी देण्यात येते. वेधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२ :**

शहर अभियंता यांनी औरंगाबाद शहर पाणी पुरवठा योजने संदर्भात शहराची भविष्यातील (वर्ष २०३१) गरज ग्राह्य धरून एका नवीन समांतर योजने संदर्भात व औरंगाबाद शहरासाठी जलनि:सारण योजने संदर्भात पुढील कार्यान्वीततेसाठी प्रस्ताव सादर केला आहे.

अ) रूपये ६७.३० कोटी किंमतीच्या संकल्पीत व मंजूर योजनेत प्रवाह गती संदर्भात काही तांत्रिक मुद्दे उपस्थित झाल्यामुळे भविष्यात सदर योजना कार्यान्वीत होईल किंवा नाही याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. तसेच सद्य:स्थितीतील पाणी पुरवठा योजना तोकडी पडत चालल्याने शहराच्या पाणी पुरवठा संदर्भात गांभिर्याने विचार करून समांतर योजने संदर्भात प्रस्ताव तयार करण्याचे ठरले आहे. या प्रस्तावात शहराची सन २०३१ ची गरजग्राह्य धरण्यात येणार असून, जलवाहिन्या ह्या सन २०३१ च्या क्षमतेनुसार टाकण्याचे प्रस्तावित आहे. तसेच इतर उपांगे उदा. जलशुध्दीकरण केंद्र, पंपींग मशिनरी वगैरे ही पहिल्या टप्प्यासाठी म्हणजेच सन २०२१ साठी संकल्पीत केली जणार आहे.

समांतर योजना प्रस्तावित करण्यासाठी व पुर्ततेसाठी प्रस्तावाचा पिटारा खालील प्रमाणे करण्याचे प्रस्तावित आहे.

१. **प्रकल्प संकल्पनार्थीची निवड करणे**

संकल्पनार्थीची निवड करून योजनेचा सविस्तर तांत्रिक अहवाल, नकाशे, अंदाजपत्रके तयार करणे.

यामध्ये उझकएएऊ (उशीीरश्र झीलिश्रळल क्शरश्रींह रवि एीं.एसिस.) तसेच महाराष्ट्र पाणी पुरवठा निकष (चरहरीरीहीीर थरींशी थींझी चरीींरश्र) प्रमाणे सविस्तर तांत्रिक अहवाल योजनेच्या सविस्तर अंदाजपत्रकासहीत तांत्रिक मान्यता घेऊन मान्यता प्राप्त संस्थेकडून (ढहळीव झरीीं खीशिलींळीिं) तपासणी करून आर्थिक अहवालासह (ऋळरिलिळरश्रझरींशीी) सादर करणे. याप्रमाणे समांतर योजनेचे संकल्पन राबवावयाचे झाल्यास निधीची उपलब्धता महानगरपालिकेस करून द्यावी लागणार आहे. तसेच प्रस्ताव तयार करण्यासाठी आवश्यक संकल्पनार्थीची निवड करण्यासाठी देखील निधीची गरजलागणार आहे.

२. **समांतर योजनेचे संकल्पन बांधा, वापरा, हस्तांतर करा (इ.जढ) या तत्वावर करणे.**

समांतर योजना तयार करण्यासाठी पर्यायी व्यवस्था म्हणून खाजगील अभिकर्त्या मार्फत योजना पुर्ण करण्याचे सुध्दा प्रस्तावित आहे. यामध्ये योजनेचे संपूर्ण संकल्पन बांधणी व मर्यादीत काळापुरती देखभाल दुरूस्ती व हस्तांतर करणे इत्यादी बाबींचा समावेश आहे. योजनेमधून मिळणारा एकूण पाणी पुरवठा व योजनेवर झालेला एकूण खर्च यावरून पाण्याचा प्रति घनमीटर दर हा काढला जऊन योजनेतील प्राप्त परिमाण संतुलन टाकीत (च.इ.ढ) प्रतिदिन घेऊन त्याची मोजमापे योग्य क्षमतेचे जलमापक बसवून अभिकर्त्यास महापालिकेतर्फे मासिक देयके अदा केली जतील. या प्रमाणे अभिकर्त्याने केलेला खर्च हा पाण्याच्या देयका पोटी अदा केला जईल. याकरीता कदाचीत इस्क्रो (**Escrow**) अकाऊंट उघडावे लागेल. या संदर्भात खाजगी अभिकर्त्यांबरोबर येत्या काही दिवसात प्राथमिक बैठक घेऊन, चर्चा करून धोरणात्मक निर्णय घेता येणे शक्य होईल. सदरचा विषय हा बराच क्लिष्ट असल्याने यावर अभ्यास करणे गरजेचे ठरेल.

विनंती की, शहराची भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेता नवीन समांतर योजना करणे अपरिहार्य आहे. त्यामुळे उपरोक्त दोन्ही प्रस्तावापैकी एक प्रस्ताव अंतिम करून निर्णय घेण्यात येईल.

ब) औरंगाबाद शहरासाठी अस्तित्वातील जलनि:सारण व्यवस्थेचा स्तर उंचावणे व मल प्रक्रिया केंद्र बांधणे यासाठी मा.सर्वसाधारण सभेने रूपये १७०.०० कोटी रक्कमेचा प्रस्ताव मंजुर केलेला आहे. त्या अनुषंगाने मा.स्थायी समितीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाकडून प्राथमिक प्रकल्प अहवाल (**D.P.R.**) तयार करणेसाठी व त्यांना संकल्पनार्थी शुल्क (**Consultancy Charges**) म्हणून रक्कम रूपये ३.४० कोटी देण्यासाठी मान्यता दिलेली आहे.

सदर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी प्रकल्प संकल्पनार्थीची निवड करण्यासाठी निविदा मागवावी लागणार आहे व त्यांचेकडून यचोजनेचा सविस्तर तांत्रिक अहवाल, नकाशे, अंदाजपत्रके तयार करणे, तांत्रिक अहवाल व अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता घेऊन, मान्यताप्राप्त संस्थेकडून unKhoc cho nho thuong voi trong long, khoc cho noi sau nhe nhu khong. Bao nhieu yeu thuong nhung ngay qua da tan theo khoi may bay that xa... http://nhatquanglan१.०catch.com

**Inspection** करूनआर्थिक अहवालासह (**Financial Pattern**) सादर करणे इत्यादी बाबी अंतर्भूत

घहलि लहर्हिींहींीसि ींळि ीसि श्रीसि, ज्ञहलि लहर्ीळि ीरीं हिश र्हिीं ज्ञहींसि. इरं हिळशीं ूर्शी ींहींीसि र्हिींसि सिरू ींरि वर ींरीं हिशज्ञहळि ारू लरू ींहरीं ुर... हीींिं://हिरीींरिसिश्ररं१.०लरींलह.लीि

करीता उपरोक्त प्रमाणे 'अ' व 'ब' प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

Khoc cho nho thuong voi trong long, khoc cho noi sau nhe nhu khong. Bao nhieu yeu thuong nhung ngay qua da tan theo khoi may bay that xa... http://nhatquanglan१.०catch.com

मा. सभापती : प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहर पाणी पुरवठा योजने संदर्भात शहराची भविष्यातील (वर्ष २०३१) गरजग्राह्य धरून एका नवीन समांतर योजने संदर्भात व औरंगाबाद शहरासाठी जलनि:सारण योजने संदर्भात 'अ' व 'ब' मध्ये प्रस्तावित केल्यानुसार योजना कार्यान्वीत करण्याकरीता आवश्यक कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, कोकणवाडी वाहतुक बेटाचे सौंदर्यीकरण करणेच्या कामासाठी सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात रू.३,७३,४१३/- ची तरतूद करण्यात आली होती व सदर काम श्री.एल.के.कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.७८६% कमी दराची निविदा मंजूर करण्यात आलेली होती व त्याप्रमाणे एल.के.कन्स्ट्रक्शन यांनी काम केलेले आहे.

वाहतुक बेटाचे सौंदर्यीकरणाचे काम करीत असतांना परिस्थितीनुरूप सौंदर्यीकरणाचे काम चांगल्या पध्दतीने होण्यासाठी, मुळ अंदाजपत्रकात वाहतुक बेट सौंदर्यीकरणासाठी ठेवलेल्या तरतुदी कमी व त्रोटक स्वरूपाच्या असल्याने ठेवलेल्या तरतुदीमधून संपूर्ण बेटाचे सौंदर्यीकरण करणे शक्य नव्हते. तसेच काम चालू असतांना तत्कालीन मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सभापती-स्थायी समिती, सभागृह नेता, विरोधी पक्षनेता यांनी कामास भेट दिलेली असून त्यांनीही सौंदर्यीकरणाचे काम चांगले होण्यासाठी काही तोंडी सूचना केल्या. त्यानुसार अतिरिक्त बाबी कराव्या लागलेल्या आहेत व सदर अतिरिक्त बाबीस रू.३,७०,०४०/- एवढा वाढीव खर्च झालेला आहे. दिनांक २७.१.२००५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती बैठकीमध्ये वॉर्ड क्र.३३ कोकणवाडी चौकाचे सुशोभिकरण करणे या करीता रू.८.०० लक्ष एवढी तरतूद उपलब्ध करून देण्यास मंजूरी दिलेली आहे.

तरी सौंदर्यीकरणाच्या कामा अंतर्गतआवश्यक असलेल्या रू.३,७०,०४०/- च्या अतिरिक्त बाबीसह (एँीर खींशाी) कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रू.७,४३,४५३/- मंजूरी मिळणे करीता सादर.

**संवाद :**

श्री.कंवरसिंग बैनाडे : विषय क्र.३३, ३४, ३५ प्रमाणे विषय क्र.४३ हा स्थगित ठेवावा.

मा. सभापती : अतिरिक्त शहर अभियंता सभागृहात उपस्थित नाहीत. तुर्त प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येत आहे.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४४ :**

शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उप अभियंता व कनिष्ठ अभियंता त्यांची कार्यालयीन कामे व महानगरपालिकेतील चालू असलेल्या विविध विकास कामावर देखरेख करण्यासाठी त्यांची वाहने वापरत आहेत. सध्या तांत्रिक कर्मचाऱ्यांना खालील प्रमाणे वाहन भत्ता मिळत आहे.

१. उप अभियंता स्वत:चे चारचाकी वाहन वापर करीत असल्यास -प्रतिमाह रूपये १८००/-

२. उप अभियंता स्वत:चे दुचाकी वाहन वापर करीत असल्यास -प्रतिमाह रूपये ५००/-

३. शाखा अभियंता व क. अभियंता स्वत:चे दुचाकी वाहन वापर करीत असल्यास -प्रतिमाह रू. ५००/-

वरील वाहन भत्त्याचा दर हा साधारणत: इ.स.१९९६-९७ पासून लागू केलेला आहे. त्यावेळी असलेली पेट्रोलची प्रति लिटर किंमत आणि आजइ.स.२००५ मध्ये असलेला पेट्रोलचा प्रति लिटर दर यामध्ये बराच फरक आहे.

करीता मा.आयुक्त महोदय यांनी दिलेल्या मान्यतेनुसार उप अभियंता व शाखा अभियंता व कनिष्ठ अभियंता या कर्मचाऱ्यांना प्रतिमाह वाहन भत्ता खालील प्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

१. उप अभियंता स्वत:चे चारचाकी वाहन वापर करीत असल्यास -प्रतिमाह रूपये २५००/-

२. उप अभियंता स्वत:चे दुचाकी वाहन वापर करीत असल्यास -प्रतिमाह रूपये ८००/-

३. शाखा अभियंता व क. अभियंता स्वत:चे दुचाकी वाहन वापर करीत असल्यास -प्रतिमाह रू. ८००/-

करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.कंवरसिंग बैनाडे : क्रमांक १, २ मध्ये नमुद केल्याप्रमाणे उप अभियंता हे एकाच संवर्गात येतात. दोन चाकी, चार चाकी असा दुजभाव का? सर्वांना समान असावे. २०००/- देण्यास हरकत नसावी.

श्री.रेणुकादास वैद्य : दुय्यम आवेक्षक, स्वच्छता निरीक्षक यांना सुध्दा वाहन भत्ता दिला जवा तसेच कनिष्ठ अभियंता यिंना जस्त प्रमाणात व्हिजेट द्याव्या लागतात. त्यांना जस्त भत्ता दिला जवा. पेट्रोलचे कुपन दिले तरी योग्य होईल.

शहर अभियंता : ज्यांचेकडे चारचाकी वाहन नाही त्यांनी चारचाकी वाहन घेतल्यास त्यांनाही २५००/- देण्यात येतील. यापुर्वी १५००/- दिलेले आहे. सदर रक्कम ही ९५-९६ च्या पेट्रोलच्या दरानुसार देण्यात येत असे. पेट्रोलची बरीच दरवाढ झालेली असून १८००/- ऐवजी रू.२५००/- देण्याचा प्रस्ताव आहे. ज्यांच्याकडे चारचाकी वाहन नाही त्यांना ५००/- रूपये देण्यात येत होते ते आता ८०/- रूपये देण्याचे नमूद केले आहे. तसेच शाखा अभियंता व कनिष्ठ अभियंता यांना ५००/- ऐवजी ८००/- रूपये नमूद केलेले आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : कनिष्ठ अभियंता व शाखा अभियंता यांना जस्त फिरावे लागते. त्यांना भत्त्याची रक्कम वाढवून द्यावी.

सौ.लता दलाल : सरसकट रू.२०००/- मंजूर करावे.

मुख्य लेखाधिकारी : वाहन भत्ता संबंधी शासनाने नियमावली केलेली आहे. लमसम वाहन भत्ता द्यायचा ठरले तरी त्यांचेकडे आर.सी.बुक इ. हे मनपाकडे जमा करावे लागतात. चारचाकी वाहनच नसेल तर वाहन भत्ता देता येणार नाही. स्वत:चे वाहन असावे म्हणून ही वर्गवारी केलेली आहे.

| | |
|---|---|
| सौ. लता दलाल | : क.अभियंता यांना जस्त फिरावे लागते. तक्रारीनुसार त्यांना काम करावेच लागते. शासनाचे नॉर्मस जरी असले तरी सहानुभूतीपुर्वक विचार करून मनपाच्या पातळीवर आपण विचार करावा. आम्ही २०००/- म्हटले. आपण निर्णय द्यावा. लाईनमन यांना सुध्दा रू.३००/- भत्ता दिला जतो. त्यातही वाढ करून रू.५००/- करावे. हा भत्ता वेतनात समाविष्ट करण्यात यावा. |
| मुख्य लेखाधिकारी | : वाहन वापरणारे विविध क्षेत्रिय अधिकारी, जकात निरीक्षक, कर निरीक्षक इ. सर्वांसाठी एकत्रित प्रस्ताव ठेवता येईल. सर्वांसाठीच वाढ करावी लागणार आहे. |
| सौ. लता दलाल | : पुढील बैठकीत सविस्तर प्रस्ताव ठेवण्यात यावा अशी सूचना आहे. |
| मा. सभापती | : कायदेशीर बाबी तपासून सर्वसमावेशक सविस्तर प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्यात यावा. |

**<u>ठराव :</u>**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सर्वसमावेशक सविस्तर प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र. ४५ :</u>**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला की,ज्योतीनगर येथे १५ लाख लिटर्स क्षमतेचा आर.सी.सी.जलकुंभ बांधून मुख्य वितरण वाहिन्या टाकण्याच्या कामासाठीचे मुळ अंदाजपत्रक रक्कम रूपये १,२२,६४,५२७/- एवढ्याचे तयार केलेले होते. त्याप्रमाणे कामास मान्यता घेऊन कामास सुरूवात करण्यात आली.

प्राचार्य शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद यांनी नकाशात सुचविलेल्या तांत्रिक बदलानुसार तसेच सदरील बाबी निविदा कक्षेच्या बाहेर असल्यामुळे व तांत्रिकदृष्ट्या करणे आवश्यक असल्यामुळे अतिरिक्त बाबींचे अंदाजपत्रक रक्कम रूपये ८,२१,१६८/- एवढ्याचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची दरसूची सन २००४-२००५ व सार्वजनिक बांधकाम दरसुची नुसार तयार करण्यात आले असून, त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे.

करीता अतिरिक्त बाबींचे अंदाजपत्रक रक्कम रूपये ८,२१,१६८/- ला तसेच सदरील काम हे काम करीत असलेले ठेकेदार मे.एल.के.कन्स्ट्रक्शन यांच्यातर्फे त्यांनी पुर्वी दिलेले दर ९% जस्ताच्या ऐवजी अंदाजपत्रकीय दराने करण्याकरीताचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

| | |
|---|---|
| श्री.कंवरसिंग बैनाडे | : जलकुंभाचे बांधकामाचे उद्घाटन २-३ महिन्यापुर्वी झालेले आहे. तीन महिन्यानंतर आठ लक्ष वाढीव खर्चाचा प्रस्ताव येत असेल तर योग्य नाही. ८ लक्ष कशासाठी वाढवून मागतात. सन ९५ मध्ये एन-८ येथील जलकुंभ बांधण्यास मंजुरी झालेली होती. कार्यवाही झालेली नाही. अद्याप त्याचा खुलासा नाही. आता या जलकुंभापर्यंत जलवाहिनी टाकलेल्या आहेत का? नसतील तर हा प्रस्ताव स्थगित करावा. एन-८ भागातील जलकुंभ का झाले नाही खुलासा करावा. |
| श्री.रविकांत गवळी | : सेंट्रल जेल जवळ १० वर्षापासून पाण्याची टाकी बांधलेली असून अद्याप तेथे पाणी पुरवठा नाही. याचा जनतेस काही फायदा नाही. |
| श्री.अजिजजहागिरदार | : पाण्याची टाकी व जलवाहिनी यांचे एकत्र अंदाजपत्रक तयार केले पाहिजे बनेवाडी भागात १० वर्षापासून टाकी बांधून ठेवलेली आहे. |
| मा. सभापती | : कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा)यांनी खुलासा करावा. |
| कार्य.अभि.(पा.पु.) | : विषय क्र.४५ मध्ये ज्योतीनगर भागात १५ लक्ष लिटर्स क्षमतेचे जलकुंभ बांधण्यासाठी मुख्य वाहिन्यांसाठी मुळ अंदाजपत्रक १,२२,६४,५२७/- |

रूपयांचे होते. यामध्ये शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाने काही तांत्रिक बदल सुचविले. आपल्या आयटममध्ये नव्हते. ते काम रू.८,२१,१६८/- वाढीव रक्कमेचे आहे.

श्री.कंवरसिंग बैनाडे : ज्या वेळेस सुरूवातीस अंदाजपत्रक तयार केले त्यावेळीच याचा समावेश का केला नाही. बदल करावा असे का वाटते. जलकुंभ बांधण्यास विरोध नाही.

कार्य.अभि.(पा.पु.) : चार मुद्दे दिलेले होते. जलकुंभाची उंची ३ मीटरने वाढविणे, जलकुंभ स्त्रोत वापरा संबंधी, पायाखालील कॉन्क्रीट एन-१०० ऐवजी एन-२०० ची करणे. जलकुंभास गळती विरोधक काम करणे. या चार कामांचा अंतर्भाव नसल्यामुळे अतिरिक्त खर्चाच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर केलेला आहे.

उप अभियंता (पा.पु.) : अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे डी.एस.आर.नुसार तयार केले होते. जे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाकडून मंजूर करून घेत असतो. पाण्याच्या लाईन टाकलेल्या आहेत.

श्री.कंवरसिंग बैनाडे : शहरात किती टाक्या बांधलेल्या आहेत, पैकी कितीचा वापर होत नाही.

श्री.रविकांत गवळी : सेंट्रल जेल हर्सूल जवळ टाकी बांधली तिचा वापर होत नाही. या टाकीस पाणी पुरवठा केला जत नाही.

मा. सभापती : शहरात कोणतेही जलकुंभ, ड्रेनेज लाईन, इमारती ह्या पुढील २५-३० वर्षाच्या काळात वापरात येण्याच्या दृष्टीने बांधण्यात येतात. बांधकाम करताना नकाशे तयार करतो त्यातून या चार बाबी का सुटल्या? प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात येत आहे. एन-७ च्या संपाच्या बाबतीत मनपा फंडातून जस्तीचे ४ लक्ष दिले. हे प्रकार थांबले पाहिजे यासाठी मा.आयुक्तांनी पाहणी करावी. एन-८ येथील टाकीचे काम १० वर्षापासून मंजूर असतांना झालेले नाही. एन-८ मध्ये टाकीचे काम करावे. हर्सुल सेंट्रल जेल जवळील टाकीत पाणी पुरवठा करण्यासाठी जलवाहिनीचे काम करावे. तसेच नक्षत्रवाडी टाकीचे काम झालेले आहे ते पाणी पुरवठा करावा. तसेच पुंडलिकनगर भागात गल्ली नं.१ ते १० येथील पाणी पुरवठा सुरळीत झालेला नाही. १५ दिवसात कार्यवाही करावी अन्यथा स्थायी समिती कार्यवासाठी मागेपुढे पाहणार नाही. दुरूस्तीसाठी अनधिकृत/अधिकृत पाहण्याची गरज नाही. सर्व कार्यकारी अभियंता यांना पुन्हा सूचना दिण्यात येते की, १५ दिवसात ३५ कोटीच्या निविदा सादर करावे. तशी कार्यवाही करावी अन्यथा होणाऱ्या कार्यवाहीस सामोरे जवे.

शहर अभियंता : १५ दिवसात पेक्षा जस्त कालावधी देण्यात यावा, ही विनंती.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवावा असे सर्वानुमते ठरले.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ४६ :**

सहाय्यक संचालक नगर रचना प्रस्ताव सादर करतात की, महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम २००१ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात गुंठेवारी कायद्याची अंमलबजवणी प्रभावीपणे करणे आवश्यक आहे. त्यासाठी महानगरपालिकेच्या निवास क्षेत्रात येणाऱ्या अनधिकृत वसाहतींना नियमानुकुल करणे व त्यासाठी नियोजनबध्द रितीने नियमानुकुल प्रक्रियेची आखणी करणे आवश्यक आहे. महानगरपालिका विकास योजनेनुसार निवास क्षेत्रात येणाऱ्या वसाहतीचे (ले-आऊट) अस्तित्वातील घरांची व भूखंडाची

स्थिती दर्शविणारे नकाशे (Lay Out) महसूली हद्दीनुसार, सर्व्हे नंबर निहाय करणे गरजेचे आहे. सदर नकाशावरून विकासाची कामे करण्याबाबत रस्त्याची आखणी, नियंत्रण, पाणी पुरवठा, ड्रेनेजलाईन या संबंधाने नियोजन करणे सोईचे होणार आहे. यासाठी खाजगी एजन्सी नेमली जवी व त्यांचे मार्फत (Total Station Survey) करण्यात यावा. त्यासाठी प्रत्येक मिळकत धारकाकडून रूपये १००/- सर्वेक्षण शुल्क आकारण्यात यावा. त्यासाठी महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या एजन्सीने अनधिकृत वसाहतीचे सर्वेक्षण करून अस्तित्वातील भूखंडाचे रेखांकन (Lay Out) अभिन्यास आराखडे तयार करावे. ज्यात खालील बाबींचा समावेश असेल.

१. सर्व्हे नंबर/गट नंबर निहाय अस्तित्वातील अनाधिकृत भूखंडाचे (Lay Out) तयार करावे.
२. सदर (Lay Out) आराखडे महसुली हद्दीनुसार असावेत.
३. नकाशे कंटुरसह असावेत.
४. नकाशावर प्रत्येक भूखंडधारकाच्या सिमेसह बांधकामाचा प्रकार, मजल्यांची संख्या, भूखंडाचे क्षेत्र, बांधीव क्षेत्र यांचा समावेश असणे आवश्यक असेल.
५. भूखंडावर अस्तित्वात असलेल्या मजल्याची संख्या बांधकाम क्षेत्रासह (ईीळश्रीं ीीं) नमुद असणे आवश्यक आहे.
६. सदर नकाशे हे सिटी सर्व्हे कार्यालयामार्फत एजन्सीने प्रमाणीत करून महानगरपालिकेस सादर करणे बंधनकारक राहील.

वरील प्रमाणे खाजगी एजन्सी आयुक्तांनी त्याची सक्षमता खात्री करून नेमावी. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

मा. सभापती : गुंठेवारीच्या संदर्भातील विषय आहे. गुंठेवारीच्या भागात कामे होण्याच्या दृष्टीने या प्रस्तावाची अंमलबजवणी करावी. प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम २००१ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात गुंठेवारी कायद्याची अंमलबजवणी प्रभावीपणे करणेसाठी खाजगी एजन्सी नेमून त्यांचे मार्फत (Total Station Survey) करण्यास व त्यासाठी प्रत्येक मिळकत धारकाकडून रूपये १००/- सर्वेक्षण शुल्क आकारण्यास प्रस्तावातील अ.क्र.१ ते ६ च्या अटी-शर्तीस अधीन राहून सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७ :**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करतात की, महानगरपालिका हद्दीत गुंठेवारी विकास अधिनियम २००१ कायद्याची अंमलबजवणी प्रभावीपणे करणेसाठी अर्जदारांना महानगरपालिकेत गुंठेवारी कायद्यान्वये आपली मिळकत नियमानुकूल करणे सोयीचे व्हावे यासाठी अर्जदारांना गुंठेवारी कायद्याची माहिती देवून त्यांचे गुंठेवारी अंतर्गत मिळकत नियमानुकूल करण्यासाठीचे परिपूर्ण प्रस्ताव तयार करून महानगरपालिकेत सादर करणेसाठी एजन्सी नेमण्यात यावी. एजन्सी ही अर्जदाराकडून गुंठेवारी कायद्यान्वये आवश्यक असणारी कागदपत्रे प्राप्त करून घेईल व मिळकत धारकांचे नकाशे तयार करून परिपूर्ण प्रस्ताव महानगरपालिकेस सादर करील. त्यापोटी अर्जदारास रूपये ७००/- मिळकतधारकास एजन्सीस देणे बंधनकारक राहील. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका हद्दीत गुंठेवारी विकास अधिनियम २००१ कायद्याची अंमलबजवणी प्रभावीपणे करणेसाठी गुंठेवारी अंतर्गत मिळकत नियमानुकूल करण्यासाठीचे

परिपूर्ण प्रस्ताव तयार करून महानगरपालिकेत सादर करणेसाठी एजन्सी नेमण्यास व त्यापोटी अर्जदारास (मिळकतधारकास) रूपये ७००/- आकारणी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८ :**

प्रकल्प संचालक यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वाल्मीकी आंबेडकर आवास योजनेचे समितीचे अध्यक्ष मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी दिनांक १३.७.२००५ रोजेच्या वॅम्बे अंतर्गत घरकूल योजना राबवावी असे अर्जसादर केले आहे. अशी एकूण ३८ वस्त्यांमध्ये घरकुल योजना राबवावी म्हणून स.सदस्यांकडून अर्जप्राप्त झाले आहेत.

योजना राबविण्यासाठी त्या वस्तीचे सर्वेक्षण करणे महत्वाचे असते. त्यात रहिवाशी हा दिनांक १-१-१९९५ पासून ते सर्वेक्षणाच्या दिवसापर्यंत त्याच वस्तीत त्याच घरात रहिवाशी असला पाहिजेव त्या घराच्या सर्वेक्षणासाठी मनपाकडून स्थापन झालेले महिला बचत गटाच्या महिलांकडून फॉर्म भरण्याचे व खालील प्रमाणे कागदपत्र महिला बचत गटातर्फे जमा करण्यात यावे असे मा.अध्यक्ष यांनी सूचित केले.

१. राशन कार्डाची छायांकित प्रत किंवा रहिवासी असल्याचा पुरावा.

२. मनपाच्या चालू वर्षापर्यंतचा घर टॅक्स भरल्याची पावती झेरॉक्स.

३. मागासवर्गीय असल्यास जतीचा दाखला.

४. औरंगाबाद तहसिलदार यांचेकडून घेतलेला उत्पन्नाचा दाखला.

५. निवडणूक आयोगाचे निवडणूक ओळखपत्र इत्यादी.

वरील कामासाठी बचत गटांना प्रती कुटुंब रू.५/- मानधन देण्यात यावे. यासाठी नगरसेवक निधीतून खर्च करावा असे बैठकीत ठरले. सदर प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवावा असे सूचित केले. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

मा. सभापती : प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॅम्बे अंतर्गत घरकूल योजना राबवावी असे एकूण ३८ वस्त्यांमध्ये घरकुल योजना राबविण्यासाठी अर्जप्राप्त झाल्यानुसार वस्तीचे सर्वेक्षण करण्याकरीता मनपाकडून स्थापन झालेले महिला बचत गटाच्या महिलांकडून फॉर्म भरण्याचे प्रस्तावात उल्लेख केल्याप्रमाणे कागदपत्र महिला बचत गटातर्फे जमा करण्यास व या कामासाठी बचत गटांना प्रती कुटुंब रू.५/- मानधन देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सदरचा खर्च नगरसेवक निधीतून करण्यासही मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

'राष्ट्रगिता'नंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद